मंतरलेली रात्र

संजय काळे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

रात्र मंतरलेली

(सान कथा)

संजय काळे

रात्र मंतरलेली. (कथासंग्रह)

लेखक: संजय काळे

पत्ता : ३, कल्याणीपुष्प अपार्टमेंट,
गिरजा देवी हाऊसिंग सोसायटी
पुंडलीक नगर, गारखेडा,
छत्रपति संभाजीनगर.

फोन : ९६८६२३३२१८
ईमेल: sanjaykale55@gmail.com

मुखपृष्ठ- डॉ. श्वेता अजिंक्य काळे

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : २५ ऑगस्ट २०२६

छापील पुस्तक उपलब्ध होईल.

लेखक किंवा प्रकाशकांना संपर्क करा.

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशित साहित्य सूची-

कादंबरी

१. शेवटचा साक्षीदार

२. धारपवाडीतील खून

३. कधीतरी अचानक

४. जीवघेणं गुपित

५. मखमली मदालसा

६. अथांग

कथासंग्रह

७. अपरात्रीचा प्रवासी

८. गूढगर्ता

९. सूर होते साक्षीला

१०. मे विंटर

११. उलट्या स्वस्तिकाची अशुभ सावली

१२. संभ्रमाच्या सावल्या

हिन्दी

१३. हादसा

१४. गहरा दाग़

१५. तीजा

१६. मोड़ के उस पार

१७.अनबूझ पहेली.

शेवटचा साक्षीदार आणि धारपवाडीतील खून ई साहित्यवर प्रकाशीत झाले आहे.
इतर साहित्य किंडलवर उपलब्ध आहे.

पिशीमावशीची ओळख करून देणाऱ्या

विंदा करंदीकरांना

सादर अर्पण

मनोगत

रहस्य गूढ कथा वाचणं सर्वांना आवडत. परंतु आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनात कादंबरीच काय कथासुद्धा वाचायला निवांत वेळ मिळत नाही.

अनेक रसिक वाचक आपली भूक प्रवासात ऑडिओ बुक ऐकून भागवतात. परंतु कथा ऐकण्यात आणि वाचण्यात फार मोठा फरक आहे. कथा वाचताना आपण पुस्तकात शिरतो. तो अनुभव जातीवंत वाचकांनाच समजतो.

एकेकाळी लेखक एका व्यक्तिचं वर्णन करताना पानंच्या पानं खर्च करत असत. वाचकही तितक्या तन्मतेनं वाचत असत. त्यांना तेवढा निवांतपणा होता. आता ती चैन लेखकाला परवडणारी नाही. त्यांनी लिहिलं तरी ते वाचणार कोण?

स्थळाचं, पात्रांचं इत्थंभूत वर्णनाला काट देऊन मुद्याची गोष्ट सांगितली तर ?

अर्थात ही गोष्ट सोपी नाही. जितकं कमी शब्दात मांडावं तितकं ते अवघड होत जातं. तरीही एक प्रयोग करून पाहायला हरकत नाही.

अलीकडच्या काळात अति लघु कथा प्रकार प्रचलित होतो आहे. अगदी तसाच नाही तर त्यासारखा काहीसा प्रकार हाताळण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत यशस्वी झाला ते आवर्जून कळवलं तर लेखकाचा उत्साह द्विगुणीत होईल.

संजय काळे.

Contents

1.मैत्री 10
2.शाळा 11
3.शह-प्रतिशह 14
4.प्रश्न मिटवला 19
5.रिकामं घर 20
6.पुनर्जन्म 25
7.चौथी मिती 27
8.खोल खोल पाणी 32
9.ब्रोमस्ट्रोकरचा मानसपूत्र 33
10.सातच्या आत घरात 37
11. कट प्रॅक्टिस 40
12.काळं मांजर 45
13.अब्द-अब्द 46
14.काळ इथं थांबेल 49
15.ते 51
16.वचनबद्ध 53
17.दुरूस्ती 57

18.सावली 60
19.टाईम मशिन..... 61
20. ऐन दुपारी..... 64
21. व्हॅलेंटाईन..... 68
22.माझे पाय पाहिलेस का? 69
23.कशासाठी 72
24.रिव्हर्स डिलेव्हरी..... 76
25.उत्तररंग 77
26.जित्याची खोड..... 82
27.धडा..... 83
28.खिडकीतला चेहरा..... 87
29.सावलीसारखी--- 89
30.जैसे ज्याचे कर्म तैसे... 91
31.तसं सांग ना मग..... 95

1.मैत्री

कावळा पिंडाला शिवल्या बरोबर मी घाटावर वाट पहाणाऱ्या मित्राकडे

‘सुटलो! झालो मोकळा एकदाचा!’ मित्राच्या पाठीवर थाप मारून विचारलं, ‘तूच माझा अपघात घडवून आणला होतास ना?’

‘मग काय करणार?’ खिदळत तो म्हणाला, ‘माझ्याशी बुद्धीबळ खेळायला कुणीच नव्हतं ना.’

2.शाळा

धाब्यावर जेवण आटोपून प्रवासी बसमध्ये चढण्याआधीच तो सिगारेट ओढून आपल्या सीटवर येऊन बसला. समोरच्या सीटवरील जोडप्याकडे पाहून त्याला आपले भविष्यचित्र दिसत होते. त्याला मिळालेल्या पत्राने बेकारीचे दिवस संपले होते. थोड्याच दिवसांत तो परमनंट होईल. त्या नंतर....

अंगभर तृप्तीची सुस्ती पसरली.

झोपण्याआधी बॅगेतलं अपॉईंटमेट लेटर सुरक्षित असल्याची खात्री करुन घेतली. ते चार ओळींचं पत्र त्यानं कितीदा वाचलं होतं. त्यातला शब्द न् शब्द त्याला पाठ झाला होता,

"कळविण्यास आनंद होतो की आपली जिल्हा परिषद शाळा, जांभूळगांव येथे नियुक्ती झाली असून आपणास सूचित करण्यात येते आहे की आपण ३१ जुलैपर्यंत कामावर रुजू व्हावे."

खाली झोकदार सही करणारा, न पाहिलेला माणूस, त्याला देवासारखा वाटत होता.

बेकारीची वेस ओलांडून उद्यापासून तो जबादारीच्या नव्या जगात प्रवेश करणार....

जेवणाची सुस्ती, खिडकीतून येणारा गार वारा. बसची एकसूरी घर-घर, त्याला कधी झोप लागली कळाले नाही.

###

शाळेच्या फाटकाशी तो जरा थांबला. मनात, मंदिरात प्रवेश करणाऱ्या भक्तासारखे भाव दाटले. छोटीसी इमारत. चार वर्गांची शाळा. प्रायमरी. शेजारी हेडमास्तरचं ऑफीस असावं. व्हरांडयात टांगलेली लोखंडी घंटा त्यातच घंटा वाजविण्यासाठी अडकलेला मोठा स्क्रू. दोनच शिक्षक एक तो, दूसरा हेडमास्तर. वर्गातून मुलांचा येणारा गोंगाट ऐकून त्याच्या अंगावर रोमांच उठले.

त्याची सावली पडलेली पाहून हेडसरांनी वर पाहिलं. त्यांच्या कपाळावर आठी पडली.

'माझी नियुक्ती झाली... शिक्षक म्हणून.'

त्यानं हातातला कागद दाखवला.

'हं!' त्यांनी न वाचताच कागद बाजूला ठेऊन दिला.

'ही तुमची शाळा नाही पण तुम्ही आलात ते बरें झाले. आमचे शिक्षक एक दिवस गेले ते परतले नाही. मला एकट्याला शाळा सांभाळायला त्रास होतो. बरं झालं तुम्ही आलात. व्हा ज्वाईन.'

'ही शाळा माझी नाही म्हणता?'

'नाही. पण ज्या अर्थी तुम्ही आलात त्या अर्थी....? बाहेर काही झालंय का?' त्यांनी अचानक विचारलं.

'बाहेर?'

ते तरातरा दारातून बाहेर पडले. नाईलाजाने तो त्यांच्यामागे धावला.

सडकेवर गर्दी जमली होती. भीषण अपघात झालेला दिसत होता. तो सरळ पुढे गेला. त्याला कुणी अडवलं नाही.

बसचा पार चेंदामेंदा झाला होता. आत अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढलं जात होतं.

'जेव्हापासून इथलं गाव डोंगराखाली गाडलं गेलं, तेव्हापासून दरवर्षी इथं काही ना काही अपघात होतोच.'

'तर हो.' दुसरा आठवणींनी कळवळला. 'शाळेत लहानलहान पोरं होती..'

'हा पहा ना बिचारा, त्याच्या खिशात अपॉंईन्टमेंट लेटर सापडलं. शिक्षक म्हणून नेमणूक झाली होती. ज्वाईन व्हायलाच चालला होता बिचारा...'

पुढचं बोलणं त्यानं ऐकलं नाही.

त्याची हेडमास्तरशी नजरानजर झाली.

डोळे पुसत तो मुकाट्यानं त्यांच्यामागून शाळेच्या दिशेने चालू लागला.

§§§

3.शह-प्रतिशह

भुवनेश्वर शर्मा गवाक्षातून बाहेरच्या अंधारात बुडालेल्या कामाक्षीपटम् नगराकडे पाहात होते. संपन्न हवेलीतील एखाद्या दुसऱ्या दिव्याच्या प्रकाशा शिवाय काही दिसत नव्हते. मध्यरात्रीचा प्रहर उलटून गेला होता. झाडांच्या पालवीवर पडणारा संततधार पावसाचा आवाज वातावरणातील गूढता वाढवत होता. अंधारातही त्यांच्या डोळ्यासमोर वैभवशाली नगरी दिसत होती. एव्हढी एकच नगरी. ही जर आपल्याला जिंकता आली तर ! त्यांनी सुस्कारा सोडला. सैन्यबळावर हे शक्य नव्हते. कूटनीतीचा अवलंब करावा तर यज्ञेश्वरशास्त्रीशी गाठ आहे. यज्ञेश्वर शास्त्री म्हणजे आकाशात उडणारी घार. किती ही उंच असो, पिलावरा संकट आले तर निमिषात घरट्याकडे झेपावणार.

त्यांनी कमी प्रयत्न केले नव्हते. पण प्रत्येकवेळी यज्ञेश्वरांनी ते चातुर्याने हाणून पाडले होते.

बाकी काही म्हणा, तुम्ही आमची बडदास्त मोठी शाही ठेवली. नाही का भुवनेश्वर?

अर्थातच. आपल्या नावाचा उल्लेख ऐकून ते वळाले.बाहेर जितकं गूढ आणि भयप्रद वातावरण होतं, किल्यात तितकंच उबदार आणि आश्वासक. सुवासिक तेलाचे दिवे शांतपणे जळत होते. सरलेल्या मैफिलाचा सूर अजून वातावरणात रेंगाळत होता. रुचकर

भोजनाच्या तृप्ती सोबतच खास मद्याचा अंमल ही महाराज चंद्रसेनाच्या मुखावर दिसत होता. ते एखाद्या गजाप्रमाणे डूलत होते.

महाराज सूर्यभानांचे आपल्यावर उपकार म्हणायचे. अन्यथा या अवचित पावसात आमची चांगलीच फजिती झाली असती. भुवनेश्वर शर्मा म्हणाले.

असे बोलून आम्हाला लाजवू नका. दोन्ही हात जोडून महाराज सूर्यभान नम्रतेनं म्हणाले. हे तर आमचे मित्रकर्तव्यच आहे. तुम्ही राजधानीलाच काय पण आमच्या राज्याच्या कुठल्याही क्षेत्रात असता तरी आपली बडदास्त अशीच ठेवण्याचा प्रयत्न आम्ही केला असता. काही उणिव राहिली असली तर आपण उदार मनाने क्षमा करा.

सूर्यभानावर मदीरेचा जराही अंमल झालेला दिसत नाही. भुवनेश्वर मनांत म्हणाले, आणि आमचे महाराज बसलेले असताना ते त्या सोन्याच्या सिंहाला टेकून उभे कां?

त्या सोन्याच्या सिंहाला ते चांगले ओळखत होते. महाराज चंद्रसेनांनी त्यांना नजर केला होता. त्यांच्या हिंमतीची, धाडसाची आणि ह्या यज्ञेश्वर शास्त्रींच्या चाणाक्ष नजरेची दाद म्हणून. पाच किलो सुवर्णापासून बनविलेल्या सिंहाचे दात, नख,आय़ाळ आणि शेपटीचे केस खऱ्या सिंहाचे होते.

त्यांची नजर यज्ञेश्वरांवर गेली. ते चंद्रसेनाच्या बाजूला हात जोडून उभे होते. त्यांच्या शांत सुस्मित चेहऱ्यावरून त्याच्या मनाचा कुठलाही ठाव लागत नव्हता. तेव्हा ही ते असेच शांत सुस्मित आणि निश्चळ उभे होते, जेव्हा शिकारीला जाण्या पुर्वी महाराज सूर्यभानांनी त्यांच्या

धाडसाला, पराक्रमाला आणि यज्ञेश्वराच्या बुद्धीमत्तेला आव्हान दिले होते.

हा एक खेळ आहे. ते जरी म्हणाले तरी ते आव्हान होते.

क्षत्रियाच्या पराक्रमाला आणि ब्राह्मणाच्या बुद्धीला डिवचले की ते माघार घेत नाही. हेच ओळखून भुवनेश्वर शर्मांनी डाव रचला होता. जो पर्यंत सूर्यभान आणि यज्ञेश्वराची जोडी फुटत नाही तोवर कामाक्षीपटनम अजिंक्य राहणार याची त्यांना पूर्ण जाणीव होती. तुल्यबळ असल्याने ते परस्परांचा आदर करुन सीमेवर शांतता ठेवायचे पण अधून मधून एकमेकांना आजमविण्याचा, दुबळी जागा शोधण्याचा प्रयत्न करीत.

सांगा आम्ही तयार आहोत.

शिकारीसाठी बारा अश्वातून तुम्ही तुमच्यासाठी दोन अश्वांची निवड करायची. त्या बारा अश्वात दोन अश्व जंगलातील काही वनस्पतीच्या वासानं किंवा ठराविक प्राण्याच्या दर्शनानं वेडावतात. उधळतात. त्यांना आवरणं महाकठीण होतं. समोर दरी आली काय आणि वृक्षाची फांदी आली काय ते थांबत नाही. मला वाटते, यज्ञेश्वरशात्रींना अश्वाची चांगली पारख आहे. अर्थात तुमची तयारी नसेल तर भुवनेश्वरशर्मा तुमच्यासाठी योग्य अश्वांची व्यवस्था करतील.

चंद्रसेनाने यज्ञेश्वरांकडे पाहिले.

महाराज, बुद्धीबरोबर वृथा अहंकार येतो. बुद्धी ही ईश्वराची देणगी आहे. तिच्यावर तुमचा कोणताही हक्क नाही. बुद्धीभ्रम होतो. बुद्धीभ्रंश होतो.

अमात्याच्या निष्ठेवर चंद्रसेन खुश झाले.बुद्धी परमेश्वराची देणगी आहे,तर पराक्रम व धाडस मानवी गुण आहे. धैर्य न सोडण्यातच पराक्रम आहे. आपण कुठे कच खातो ह्याचीच तर परीक्षा पाहायची आहे सूर्यभानांना.

काळजी नसावी. माझा तुमच्या बुद्धीमत्तेवर पूर्ण विश्वास आहे. तुम्ही माझ्या अश्वारोहणावर विश्वास ठेवा. कसलाही नाठाळ घोडयावरुन माझी मांड सैल होणार नाही.

त्यांना निरोप देताना, त्यांच्या पराक्रमाचे, धैर्याचे आणि यज्ञेश्वराच्या बुद्धीमत्तेचे कौतूक म्हणून महाराजांनी तो सिंह त्यांना नजर केला होता.

हा तोच सिंह आहे ना, जो महाराजांनी तुम्हाला नजर केला होता? भुवनेश्वर शर्मांनी विचारले.

चंद्रसेनांनी यज्ञेश्वराकडे कटाक्ष टाकला.

यज्ञेश्वर हात जोडून पुढे आले.

नाही. ही त्याची प्रतिकृती आहे. एव्हढं बोलून त्यांनी टाळी वाजवली. दरवाजातून एकामागून एक भू लोकीच्या अप्सरा आत आल्या. सूर्यभान उत्तेजित होऊन अनिमिष त्यांच्याकडे पाहतच राहिले. त्याचा चेहरा प्रसन्न दिसू लागला.

ह्या आमच्या नगरवधू. यज्ञेश्वर भूवनेश्वरांकडे कटाक्ष टाकून पुढे बोलू लागले. त्यांच्या कटाक्षात आव्हान होते. महाराजांना आणि आपल्यालाही आवडेल तिच्यासोबत आपण रात्र घालवू शकता. पण...

क्षणभर थांबून यज्ञेश्वर पुढे बोलू लागले,

भूवनेश्वर शर्मा योग्य पारख करुन आपल्यासाठी जोडीदार निवडतील अशी आम्हास खात्री आहे. अर्थात महाराज, हा एक खेळ आहे. आपली तयारी नसेल तर मी आपल्यासाठी योग्य जोडीदारांची निवड केलेली आहे.

त्यांच्या गोंधळलेल्या प्रश्नांकित मुद्रा पाहून यज्ञेश्वर म्हणाले,

त्यांच्यात दोन विषकन्या आहेत.

4.प्रश्न मिटवला

रोजच शाळेतून मैत्रिणीची काहीतरी तक्रार घेऊन येणारी मुलगी आज शांतपणे दप्तर ठेऊन, मोबाईलचा हट्ट न धरता खाण्यासाठी टेबलावर बसली तेव्हा आईनं आश्चर्यानं विचारलं,

“आज तुझ्या मैत्रिणीनं तुला त्रास दिला नाही ना?”

“ती मला पुन्हा कधीच त्रास देणार नाही.”

“का? शाळा बदलली का तिनं?”

“नाही. आज मी तिला तिसऱ्या मजल्यावरून ढकलून दिलंय.”

§§§

5.रिकामं घर

ॲम्ब्युलन्सनं मला सोसायटीत सोडलं तेव्हा सूर्य टळटळीत माथ्यावर होता. ॲब्युलन्स पाहून सेक्युरीटीनं मुकाट रॉड उचलला. चौकशी नाही काही नाही. आजारच असा झाला होता कि सेक्युरीटीच काय घरच्या लोकांकडूनही अपेक्षा नव्हती.

करोनात सोसायटीत ॲब्युलन्सचं काही कौतुक उरलं नाही. पूर्वी सोसायटीत ॲब्युलन्स आली की लोक गॅलरीत उभं राहून पाहत. उत्साही लोक खाली उतरून तिच्या भोवती गोळा होत. ती येण्याआधी कशासाठी आणि कुणासाठी आली याची साऱ्या सोसायटीला माहिती असायची. ॲब्युलन्स जाईपर्यंत बाया चुकचुकत गॅलरीत आत बाहेर करत राहायच्या.

आज असं काही नव्हतं. सोसायटी निर्मनुष्य असल्यासारखी भगभगीत वाटत होती. सोसायटीच कां, सारं शहर कर्फ्यू लागल्यासारखं सुनसान झालं होतं.

भीती आणि दहशत!

रस्त्यावर जीव घेऊन धावणाऱ्या ॲब्युलंसचे भीतीवर गडद पुटं चढवणारे सायरन. सुनसान रस्त्यावर सायरनची काही गरज आहे कां? ऐकणाऱ्यांचं काळीज कापतं. देह आक्रसून जातात.

मरण काही कुणाला अपरिचित नाही. पण मरणाचं असं भयावह रूप पूर्वी कधी पाहिलं नव्हतं. एकदा घरातून माणूस दवाखान्यात गेला की त्याचं पार्थिवसुद्धा परत येण्याची शक्यता नाही.

येणार फक्त बातमी. डेथ सर्टिफिकेट.

मी ॲब्युलन्समधून उतरलो.

मला घ्यायला कुणी आलं नव्हतं. सून, मुलगा अगदी पत्नी देखील नाही. ड्रायव्हरला टीप देण्याची इच्छा होती, पण खिशात नव्हतं. हॉस्पिटलला घालून गेलो तेच कपडे अंगावर होते. पेमेंट मुलगा घरून ऑनलाईन करीत होता.

घरात पोहचलो. मॅटखाली ठेवलेल्या किल्लीनं लॅच उघडलं. घरात कुणी असणार नव्हतं. कससंच वाटलं. एरवी मरणाच्या दाढेतून वाचून आल्यावर घरातले लोक कौतुकानं औक्षण करतात. इथं दार उघडायला कुणी नव्हतं. घरात शांतता होती. आणि हे काय?

पत्नीला देवासमोर दिवा लावायला सांगितला तिनं पणती लावून ठेवली. काय बावळटच आहे! ओरडणार कुणाला? घरात कुणी नाही. सारे गेलेत मुलाच्या फ्लॅटवर.

आता दोन आठवडे, चौदा दिवस एकट्यानंच काढायचे. आयसोलेशन. बघता-बघता निघून जातील. मग पुन्हा आहेच आपलं भरलं घर. मनाची समजूत काढली तरी एकट्यानं राहणं काही सोपं नाही. लग्नानंतर क्वचितच एकट्यानं राहावं लागलं होतं. रिटायर झाल्यावर आणि मुलाचं लग्न झाल्यावर तर नाहीच.

करमलं नाही की मी खिडकीत बसतो. खिडकीतून सारं काही दिसतं. कोण आलं, कोण गेलं. समोरचा रस्ता. रहदारी. आजकाल रहदारी नाही. काही तुरळक वाहनं जातांना दिसतात. मास्क घातलेले

सफाई कामगार. मास्क न घातलेले, सिग्नलाला उभे राहणारे भिकारी. त्यांना होत नसेल का करोना?

रस्त्याच्या पलिकडे शाळा आहे. सध्या बंदच आहे. कधी काळी शाळेच्या मैदानावर खेळणारी मुल दिसायची. क्रिकेट, फुटबॉल त्यांची वर्गात जाण्याची धावपळ, शिक्षकांची लगबग. सारं आठवणीत उरल्यासारखं वाटलं.

कधी टिव्ही लावून बसतो. घरातल्या वस्तूंची मांडणी बदलतो. तरी वेळ जात नाही. रॉबीन्सन क्रुसो अठ्ठावीस वर्ष एकटा कसा राहिला असेल?

कधी एकदा दोन आठवडे संपतील? पुन्हा कुटुंबात जाण्यासाठी जीव अगदी उतावीळ झालाय.

अखेर प्रतीक्षा संपली.

दाराच्या लॅचमध्ये किल्ली सरकवल्याचा आवाज आला. मुलगाच असणार. झाले एवढ्यात चौदा दिवस? वेळ कसा गेला कळलं नाही.

मुलगाच होता. त्याच्या बोलण्याचा आवाज येत होता. मला वाटलं तो सरळ माझ्या खोलीत येईल पण तो इतर खोल्यातून फिरत होता. सोबत कुणीतरी होतं. त्यांच्या बोलण्याचा आवाज येत होता.

घरभर फिरल्यावर माझ्या रूमचं दार उघडून तो आत आला. पाठोपाठ एक तरूण जोडपं. माझ्याकडे कुणाचं लक्ष दिलं नाही. जणू काही मी त्यांनी दिसत नव्हतो. परक्याचं ठीक आहे, पण ह्या गधड्याला कळायला नको?

“ही आमच्या वडिलांची खोली.” मुलगा म्हणाला.

“हं..किती रूम्स आहेत?” तरूणीनं विचारलं.

“थ्री बी एच के.” मुलगा म्हणाला. “दोन अटॅच्ड् बाथरूम आहेत. दोन गॅलरीज. शाळा रस्त्याच्या पलिकडेच आहे. ह्या खिडकीतून दिसते.”

“चांगला आहे फ्लॅट. पण तुम्हाला कां विकायचाय?”

‘विकायचा!’ मला न विचारता फ्लॅट विकणारा हा कोण?

“वडिलांनी घेतला होता. लग्नानंतर मी वेगळा घेतला. गेल्या वर्षी कोरोनात वडिलांचा देहान्त झाला. दवाखान्यात गेले ते परत काही आले नाही. तेव्हापासून आई आमच्याकडेच राहते. आमचं येऊन पाहणं होत नाही. ठेऊन काय करायचा?

मी विस्मयानं त्याच्याकडे पाहातच राहिलो. माझ्या तोंडून शब्द फुटत नव्हता. धडधडीत बाप उभा असताना तो देहान्त झाल्याचा सांगत होता.

दवाखान्यातल्या लोकांनी मला अब्युलन्समधून कुठं नेलं होतं? घरीच आणलं होतं ना? हा तर म्हणतो, ‘गेले ते परतलेच नाही.’ माझ्या आजारपणाचा फायदा घेऊन फ्लॅट हडपण्याचा डाव दिसतो.

“इथं कुणीतरी राहतं- वावरतं. चालल्याचा आवाज येतो. फर्निचर हालवण्याचा आवाज येतो. टिव्ही आपोआप चालू होतो. म्हणजे... असं कानावर आलं.” तरूण स्त्री तरुणाकडे दृष्टीक्षेप टाकत म्हणाली.

“सोसायटीतील लोक काहीही बोलतात. अफवा आहेत नुसत्या. त्यांना स्वस्तात फ्लॅट लाटायचाय. तसं काही नाही. आजच्या जमान्यात अशा भाकड गोष्टींवर कोण विश्वास ठेवणार? मी सांगतो

तुम्हाला, इथं कुणी राहत नाही. तुम्हाला आवडला असेल बिनधास्त घ्या. कुणी वावरत नाही इथं. हा फ्लॅट रिकामा आहे.”

‘रिकामा कसा? मी राहतो न इथं? कोण येतं राहायला मी बघतोच!’

माझं बोलणं त्यांच्या कानावर गेलं नाही. आपसात बोलत ते बाहेरच्या दाराला कुलुप लावून निघून गेले.

नव्या जाणिवेनं हादरलेला मी, जागीच खिळून, दूर जाणारा पाऊलांचा आवाज ऐकत उभा होतो.

§§§

6.पुनर्जन्म

च्यामारी!

दारू लई वंगाळ चीज हाये.

घरून निघताना कारभारीन बजावून सांगते, "मजुरी मिळाल्यावर सरळ घरी या. घरात बसून काय पेयाची त्ये प्या. पर येतना वाटंत पिवू नका. रस्त्यात पडतात कुठं बीन. आन्ल कुनी घरला त आन्ल न्हाईतर सुद यिल तव्हा घरला परतायच रात्री बेरात्री.''

मजुरी मिळायच्या दिशी कारभारीन सांगतेच सांगते. तवा लई संताप येतो. पर खरी गोष्ट हाये म्हटल्यावर गागता बीन येत नाही.

तीनं बोलल्या परमानंच झालं.

सोबत्याला काय 'न्हाई' बोल्ता आल न्हाई. एक बाटल घेऊन घरला जाऊ म्हटल, तर उगी आपला एक पेग घ्यावा म्हणून घेतला.

मंग किता येळ गेला काय कळलच न्हाई.

'हे इथं तर घर हाये' म्हून झुलत घरला निघालो. यव्हढी पक्की याद हाय.

राती जाग आली तव्हा कुठं व्हतो काय कळना. कुनाला इचाराव त सामसुम. आजूबाजूला पाह्यल तवा शेकोटी पेटवून तिघं-चौघं बसलेले दिसले. त्यांनाच इचारू म्हून जवळ गेलो तर ते बी आपले दोस्तच निघाले. एक खंबा घेऊन चौघे बसले होते. उगी रेंगाळलो, त

त्यांच लक्ष गेल. कुणाला तरी डोळ्यातली वखवख जाणवली. ज्याचा दर्द त्योच जाणतो.

“घेतोस का?”

म्या लाजतच हो बोललो. त्यांनी जागीच खरकून जागा करून दिली.

“आता पुन्हा कधी भेट?” एकानं इचारलं.

“आपल्या काय हातात आहे? नशिबात असेल तेव्हा भेटू.” ज्याला इचारलं त्यो दुःखानं बोलला.

“बाकी तुमच्या सहवासात दिवस चांगले गेले.” त्याच्या शेजारला बोलला.

“माझेही. आलो तेव्हा वाटलं होतं, कसं होईल? सहावर्ष कुठं गेली कळलं नाही.” दुःखी आवाजवाला उसासून म्हणाला, “चला निघायची वेळ झाली.”

“चला,” तिसरा त्याच्याशी हात मिळवून म्हणाला. “राहू द्या ओळख-पाळख.”

“ह्यांची बदली झाली का?” न रहावून मी विचारलं.

त्यांनी माझ्याकडे चमकून पाहिलं. माझं नवखेपण त्यांच्या लक्षात आलं. निरोप घेणारा उत्तरला,

“हो. माझे इथले दिवस भरले. आता माझी पुनर्जन्म घेण्याची वेळ आलीय.”

7.चौथी मिती

“झालं की नाही तुझं अजून? कधी झोपणार आहेस?” निर्वाणीच्या सुरात बायकोनं विचारलं.

त्यानं लॅपटॉपवरुन नजर उचलली. बेडरुमच्या दारावर हात ठेऊन उभी असलेली, नाईटगाऊनमधल्या बायकोला पाहून त्याला वाटलं, काम गेलं खड्ड्यात! पण त्याला माहित होतं आज कामाचा कंटाळा केला तर उद्या ते दुप्पट होऊन येणार.

“झालं. पाचच...”

बोलणं पूर्ण व्हायच्या आत धाडकन् दार बंद झालं.

तिचा राग सहाजिक होता. आजच ते ह्या फ्लॅटमध्ये शिफ्ट झाले. घरभर पसारा पडला होता. दिवाणावर जेमतेम झोपण्याची सोय केली. बाकी सामान उद्या लावू असं हॉटेलमध्ये जेवण करतानाच ठरलं. जुन्या घरातून सामान शिफ्ट करायला मुव्हर्स आणि पॅकर्स होते तरी दिवसभर त्यांच्या बरोबर उभं राहून दमालयला झालं होतं.

तसं घर बदलण्याची गरज नव्हती. एका मित्राकडे फंक्शनला आले तेव्हा सोसायटी पाहून दोघं खुश झाले. दहा मजली दोन-अडीचशे ब्लॉक्सची सोसायटी. स्वीमिंगपूल, जीम, लायब्ररी.

“धीस इज लिव्हींग लाईक.” तो म्हणाला.

“ये मग राहायला. आहेत ब्लॉक्स रिकामे.” मित्रानं आमंत्रण दिलं

सातव्या मजल्यावरील फ्लॅट मस्त होता. प्रवेशदार दक्षिणेस, हॉल, पूर्वेला गॅलरी. डाव्या बाजूला किचन, उत्तरेला भींतीपासून पंधरा पाऊलं चालत गेलं की बेडरुम त्याला लागूनच मास्टर बेडरुम.समोर अँडिशनल बाथरुन टॉयलेट.

घर पाहून त्यांनी लगेच शिफ्ट व्हायचं नक्की केलं.

शिफ्टींगच्या धावपळीत ऑफिसचं पेंडिंग राहिलेलं काम पूर्ण करावं या इराद्याने तो लॅपटॉप उघडून बसला. घरुन सपोर्ट करील ह्या बोलीवरच त्याची सुटी मंजूर झाली होती. उद्याचा दिवस सामान लावण्यात जाणार, तेव्हा उशीरा बसून काम पूर्ण करणं नैतिक होतं.

लॅपटॉप बंद करण्यापूर्वी वेळ पाहीली. अकरा पाच. लॅपटॉप तसाच बाजूला ठेऊन तो उठला. बेडरुमचे दार हट्टी मुलासारखे बंद असले तरी त्याला माहीत होतं,ते त्याची वाट पाहात असणार.

त्यानं दिवा बंद केला तसा घरभर काळोख पसरला. आकाशात ढग असल्याने गॅलरीतून रात्रीचा प्रकाश झिरपत नव्हता.

नवीन घर असल्यानं सराईतपणे चालता येत नसले तरी हात पसरुन तो अंदाजानं बेडरुमकडे निघाला. साधारण दहा पावलं चालल्यावर हाताला बेडरुमचं दार लागायला हवं होतं. सावकाश एक पाउल उचललं. हाताला दरवाजा लागला नाही. अजून दोन पावलं पुढं सरकला. तरीही हात हवेत फिरला.

असं कसं शक्य आहे? दिवा मालवून तो बेडरुमच्या दिशेनेच चालत आला. आतापर्यंत दार लागायलाच पाहिजे होता.

सरळ रेषेत वीस-पंचविस पाऊलं चालून झालं! हॉल एव्हढा लांब थोडाच आहे? दिशाभ्रम झाला म्हणावं, तर हॉलच्या कुठल्याही भींतीत पंधरा पावलांपेक्षा जास्त अंतर नाही.

तो दिवा लावण्यासाठी आल्यापावली परत फिरला. पंचविस पावलं झाली! तरी स्वीचबोर्ड हाताला लागला नाही. आता तो चक्रावला. काय करावं समजेना. त्याने पत्नीला आवाज दिला.

"अगं, जरा दार उघडतेस का? काळोखात काही दिसत नाही."

दार उघडले, तसा मंद प्रकाशाचा झोत बाहेर आला.

"काय झालं," बोलत तो दार उघडून आत जात म्हणाला,"अंधारात कशाचा अंदाज..."

पुढचे शब्द ओठातच थिजले. कारण पलंगावर एक सुंदर, तरुण,अनोळखी स्त्री बसलेली होती. अतिश्रमाने आणि दिवसभराच्या थकव्याने भ्रम होतोय. त्याने डोळे मिटून घेतले.

त्याच्या कानावर नाजूक हसण्याचा आवाज आला. त्याची अवस्था पाहून ती हसत होती.

"तुम्ही खऱ्या आहात! कोण आहात तुम्ही? इथं कसे आल्यात? माझी पत्नी कुठे?''

यावेळी ती मोठ्याने हसली.

"अहो मिस्टर," हसू आवरत ती म्हणाली, "मी खरी आहे. मी आले नाही, तुम्ही इथं आलात.बघा, ही माझी बेडरुम आहे.''

''खरंच.'' तिच्याकडे पाहत असल्याने त्याच्या लक्षांत आले नव्हते.

त्याचा चेहरा खूप बावळट झालेला पाहून ती खळाळून हसली.

''मी इथं कसा आलो?''

तिने डोळ्यातले पाणी पुसलं.

''तुम्ही नव्याने राहायला आलात का?''

''आजच''

''म्हणून तुम्हाला काही माहीत नाही. घरातले सगळे दिवे मालवून तुम्ही कुठल्यातरी रुममध्ये जात होता का?''

''हो.''

''बरोबर. नवीन माणसाला असं होतं. तुमच्या घराचं वैशिष्ट्य आहे. कुठेतरी चौथी मिती तयार झाली. सरावानं, दिवा न लावता आपण घरात वावरू शकतो. पण कधीतरी ही मिती उघडी राहते आणि तुम्ही सरळ आमच्या घरात प्रवेश करता. एकदा तर...'' तिने बोलणं अर्धवट सोडलं. तिच्या गालावर लाली आली.

मला त्या कुणाची असूया वाटली.

''आता परतायचं कसं?''

''सांगते. पुन्हा घरात दिवे मालवून चालू नका. पुढच्यावेळी तुम्ही चुकीने आलेले नसणार.'' तिच्या आवाजात धमकी होती.

सूर बदलून ती म्हणाली,

''फार थकलेले दिसता. तुम्हाला काही पेय देते. तुम्ही बाहेर बैठकीत बसा. मी आलेच.''

वळून मी बाहेर पडलो.(सभ्य माणसाच्या) सवयीप्रमाणे (तिच्या) बेडरुमचे दार बंद केले. काळोख झाला तशी मला चूक कळून आली. काहीच दिसत नव्हतं. पुन्हा वळून दरवाजा उघडायला संकोच वाटला. मी तसाच चाचपडत निघालो.

पायाला काहीतरी लागले. चाचपडून पाहिलं, तो सोफा होता. तिची वाट पाहत मी निवांत बसलो.

''अजून झालंच नाही का तुझं?''

मी दचकून समोर पाहिलं. बेडरुमच्या दरवाजावर हात ठेऊन बायको भांडण्याच्या अभिनिवेशात उभी होती.

'तूच आहेस होय !'

आनंदी-दुःखानं तो बेडरुमकडे निघाला.

(झपूर्झा दिवाळी अंक)

§§§

8.खोल खोल पाणी

कपडे उतरवून पाण्यात शिरणार तेव्हढयात प्रगटल्याप्रमाणे 'तो' दिसला.

'जास्त आत जाऊ नको. काठावर स्नान कर.' त्याने धमकीवजा इशारा दिला.

त्याला निघून गेलेला पाहून मी खोल पाण्यात सूर मारला, तर तो तिथं, तळाशी निवांत झोपलेला होता.

माझी चाहूल लागताच डोळे न उघडताच म्हणाला,

'ऐकलं नाहीस ना माझं? ये. झोप माझ्या शेजारी. निवांत.

§§§

9.ब्रोमस्ट्रोकरचा मानसपूत्र

रेल्वे डब्याच्या बाहेरील बाजूच्या दोन्ही रॉडला पकडून पंजावर उभं राहून, शरीराची कमान करुन काढता येईल तेव्हढं शरीर बाहेर काढले. रिमझिमणाऱ्या पावसाचे तुषार तिच्या चेहऱ्यावर पडले. अंगभर एक प्रसन्न शिरशिरी येऊन गेली. ताणलं गेल्यानं बसून आंबलेल्या शरीराला बरं वाटलं. रेल्वे ढिम्म उभी होती.

काल सायंकाळी सहाला अहमदनगरला येणारी गाडी रात्री दहाला आली. झालेला उशीर कव्हर करणे तर दूर, त्यात भर पडत होती. मागून येणाऱ्या ट्रेन्स पुढे जात होत्या.

पावसातून बचाव करण्यासाठी तिनं शरीर आत घेतलं. जागीच उभं राहून सभोवर नजर टाकली. आपण नक्की कुठे आहोत याचा अंदाज येत नव्हता. महाराष्ट्रात आहोत, आंध्रात, की कर्नाटकात? संध्याकाळ उतरल्यानं पावसातमुळे वातावरणाला गूढ झालं होतं. पावसाच्या झिरझिरीत पडद्यातून समोरची ख्रिश्चन स्मशानभूमितील थडगे आणि क्रॉस दिसत होते.

प्रवासात वाचायला आणलेल्या, अर्धवट वाचून झालेल्या, ड्राकुलाची आठवण होऊन अंगावर भीतीची लहर दौडत गेली.

पावसाळ्यामुळे ट्रेनला गर्दी नव्हती. फर्स्टक्लासच्या कूपेत तर ती एकटीच होती. गाडी थांबल्यानं दिवे मंदावले. तिच्याकडे किंडल डिव्हाईस असल्यांनं त्याचा लाईट अडजेस्ट करुन वाचता येत होतं. पुस्तक असतं तर ठेऊन द्यावं लागलं असतं.

आपल्याला हा कंटाळवाणा प्रवास करायला लावणाऱ्या अमेरिकन स्थळाचा तिला राग येत होता. त्याला न पाहताच नापसंती कळवण्याचा तिनं निश्चय केला. तिला येण्याची इच्छा नव्हती पण मुलगा अमेरिकेला परतणार होता. जाण्याआधी त्याला मुलगी पसंद करायची होती. लग्न नंतर. डिसेंबरात.

त्याला मनोमन शिव्या देत ती आपल्या कूपेकडे परतली. कूपेत अंधार होता. तिनं हात दिव्याच्या बटनाकडे गेला. तेवढ्यात तिच्या कानावर खर्जातला आवाज आला,

"दिवा लाऊ नकोस." तिचा हात थबकला.

तिनं वळून पाहिलं.

अंधारलेल्या संध्याकाळी कूपेच्या दाराबाहेर उभी असलेली त्याची केवळ आकृती दिसत होती. त्यानं डोक्यावरील काळी हॅट कपाळावर बरीच पुढे ओढून घेतली होती. अंगात गुडघ्यापर्यंत पोहचणारा काळा कोट.

गाडी स्टेशनवर उभी नसताना हा अचानक कुठून प्रगटला?

कदाचित्, मागच्या स्टेशनवर गडबडीत चालत्या गाडीत हाताला लागेल त्या डब्यात चढला असणार आणि आता गाडी थांबल्यावर आपली सीट शोधत आलाय.

"गरज असल्याशिवाय दिवा लाऊ नको." आंत येवून तो म्हणाला.

त्याच्या आवाजात निर्दय धमकी होती. गाभाऱ्यात घुमावा तसा त्याचा आवाज येत होता. त्याच्या पाठोपाठ आलेल्या गार हवेच्या झोतानं तिचं अंग शहारले.

आतापर्यंत तिला कुणीतरी सोबतीला हवसं वाटत होतं, पण आता वाटलं, एकांतच बरा होता.

त्याच्याशी वाद न घालता तिनं किंडल उघडून वाचायला सुरवात केली. तिच्या चेहऱ्यावर पडलेल्या पांढऱ्या प्रकाशाचं कुतूहल वाटून त्यानं विचारलं,

"काय आहे ते तुमच्या हातात?" त्यानं अतिशय सभ्य आणि खानदानी भाषेत विचारलं. त्याला किंडल माहीत नाही !

"किंडल आहे."

"किंडल? म्हणजे?"

"म्हणजे पॉकेट पुस्तकालय. ह्यात पुस्तकं स्टोअर करून ठेवता येतात आणि हवी तेव्हा वाचता येतात." गाव-खेड्याचा दिसतो बिचारा.

"अंधारातसुद्धा!"

"हो."

"असं! कुठलं पुस्तक वाचता आहात?" त्याने कुतुहलानं विचारलं.

"ड्राकुला."

“ड्राक्युला!” तो उद्गारला. त्याला ड्राकुला माहीत असावा याचं तिला आश्चर्य वाटलं.

“तुम्हाला माहीत आहे ड्राक्युला!”

“म्हणजे काय!” विनोद व्हावा तसा तो हसला, त्याचे प्रमाणापेक्षा लांब सुळे अंधारातही उठून दिसले. “वाटलं नव्हतं ब्रॅमस्टोकर इतक्या दिवसानंतर वाचला जात असेल. तेव्हा मला वाटलं, काहीतरी फॅड आहे. नवीन नवीन वाचक वाचतील आणि विसरुन जातील. तो भलताच टिकलेला दिसतो.”

ब्रॅमस्टोकरचा एकेरी उल्लेख ऐकून तिला गंमत वाटली. ती अंधारात दडलेल्या त्याच्या चेहऱ्याकडे पाहू लागली. तिच्या डोळ्यांत किंडलचा प्रकाश पडल्याने तिला त्याचा चेहरा स्पष्ट दिसत नव्हता.

तुम्ही ओळखता ब्रॅमस्टोकरला? तिनं मिस्किलपणे विचारलं.

“म्हणजे काय!” घुमणाऱ्या सुरात तो म्हणाला, “ मी त्याचा मानसपुत्र आहे.”

10.सातच्या आत घरात

31 डिसेंबरची रात्र!

रात्रीचा एक-दीडचा सुमार.

तरी निघताना आईनं बजावून सांगितलं होतं, “आज 31 डिसेंबरची रात्र आहे, फार वेळ बाहेर राहू नको. कुणाच्या वाटेला जाऊ नको. दारू प्यायलेले असतात. आपण काय करतो हे देखील त्यांच्या लक्षांत येत नाही. दुसऱ्या पोरींशी आपल्याला काय करायचं? तू लवकर घरी ये.”

तीन-तीनदा सांगितलं तेव्हा आईचा राग आला. तिच्यावरच खेकसले. शेवटी व्हायचं तेच झालं. आता आई ओरडणार. त्याचं टेंशन नाही. टेंशन आहे ते माझ्यासारखे चुकार आणि टूकार मागे राहिलेत त्यांना चुकवून सुखरुप घरी कसं जायचं? सभ्य माणसं केव्हाच घरी गेली. आता रस्त्यावर दहशत आहे, भीती आहे ती जनावर जागं झालेल्या माणसांची.

मागून दूरून येणाऱ्या मोटरबाईकचा भीतीदायक कर्कश्य आवाज जवळ येतोय. हॉर्न दाबून ठेवलाय. कानाला दडे पडतात. भीतीनं अंग शहारते. बाईकवरील तीन स्वारांचे विचित्र ओरडण्याचे आवाज शांततेत काळीज कापत जातात.

चालण्याचा वेग वाढवून उपयोग नाही हे समजूनही पायांना गती येते.

टप टप टप.....

अशा वेळेस चपलांचा आवाजही लक्ष वेधून घेण्याएवढा मोठा होतो. माझं अंग ताठरतं. आईचं न ऐकल्याबद्दल स्वतःला शिव्या घालत सभ्य मुलीसारखी मान खाली घालून झप-झप चालण्याचा प्रयत्न करते.

मोटरसायकल ओव्हरटेक करताना माझ्याकडे पाहून तिघेही वेड्यावाकडं किंचाळतात. तिसरा हात लांब करून माझ्या डोक्यावर टपली मारतो. बाकीचे जोरात खिदळतात. बाईक दूर जाते.

मी सुटकेचा निःश्वास टाकते.

चला एव्हढयावर निभावलं.

दूर गेलेली बाईक थांबली, वळली आणि माझ्या दिशेनं येऊ लागली. तशी मला पुढे होणाऱ्या घटनांची आशंका आली. सुटकेसाठी मी आजूबाजूला पाहिलं. शेजारी एक गल्ली होती. गल्लीत घुसून कुठे अंधारात दडता येईल का याचा अंदाज येण्याआधीच बाईक जवळ येऊन उभी राहिली.

गाडी स्थिर होण्याआधीच मागचे दोघं उतरले. विकृत हसत ते माझ्या दिशेने झोकाड्या खात झेपावले. मोटरबाईक स्टँडला उभी करुन चालकही त्यांना सामिल झाला.

वासनेने विकृत झालेले त्यांचे चेहरे... पिवळे दात दाखवणारं ओशट हसू... डोळ्यातून ओसंडणारी लसलस...

मी हूलकावणी देऊन गल्लीत पळण्याच्या आत एकानं झडप घेऊन हात धरला. दोघांनी अस्थीर हातांनी, शुटिंग करण्यासाठी, मोबाईल काढले.

आता मात्र माझा नाईलाज झाला.

पळण्याचा प्रयत्न न करता मी ठाम उभी राहिले. माझा हात धरणाऱ्या हात पिरगाळला. आता मी त्याच्यामागे होते. त्याच्या चेहऱ्यावरील वेदना मला दिसत नव्हती.

माझा अवतार पाहून दोघांच्या हातातला मोबाईल गळून पडला. भीतीने किंचाळत तोल सावरत, मोटरसायकल तिथंच ठेऊन पळून सुटले.

रस्ता हवा तसा सुनसान होता. मी त्या पोराचा शर्ट टरकावला. दिव्याच्या प्रकाशात त्याच्या गोऱ्यापान मानेवर सोन्याची साखळी चमकली.

एखाद्या रसाळ फळात दांत खुपसावे तसे मी त्याच्या मानेत सुळे खुपसले.

घरी आल्यावर, माझा अवतार पाहूनच आई ओरडली,

हडळे, आलीस ना उपद्वाप करुन!

आईच्या ओरडण्याकडे माझे लक्षच नव्हते. मी सुळ्यांना आणि ओठांना लागलेलं चवदार रक्त चाटण्यात मश्गुल होते.

§§§

11. कट प्रॅक्टिस

कार पार्क करुन तो खाली उतरला तेव्हा अकरा वाजून गेले होते. इतक्या रात्रीची अपॉईन्टमेंट देणारा भुतांचा डॉक्टर असला पाहिजे. त्याच्या मनांत विनोदी विचार आला. डोळ्यांवरचा गॉगल ठीकठाक करुन त्याने कशीबशी तग धरुन उभी असलेल्या सात मजली इमारतीत प्रवेश केला.

स्वतःच्या शरीराचं ओझं जड झालेल्या म्हाताऱ्याप्रमाणं कण्हत लिफ्ट सातव्या मजल्यावर पोहचली.

कॉरीडॉरच्या शेवटच्या कोपऱ्यातल्या हटवादी दवाखान्याशिवाय दुसरं काहीच नव्हतं. काळ्या पाटीवर पितळी अक्षरात डॉक्टरांचं नाव लिहीलेलं होतं. कॅरिडोरमध्ये झिरोचा बल्ब जळत होता तेव्हढाच मंद प्रकाश. त्याला बरं वाटलं.

डॉक्टर त्याचीच वाट पाहत होते.

"अशा अवेळी अपॉईन्टमेंट दिल्याबद्दल धन्यवाद." त्यांच्या समोर खुर्चीवर बसत तो म्हणाला.

डॉक्टरांचे सफरचंदासारखे लालचुटूक गाल रुंदावले.

"त्याची काळजी तुम्ही करु नका. तुमच्या वडीलांनी त्याची भरपाई केली आहे."

त्याची नजर डॉक्टरांच्या मागच्या भिंतीवर लटकलेल्या डिग्रीवर पडली. डिग्रीचा कागद पिवळा पडला होता. चॅन्सलरच्या सही खाली काळ्याशाईत तारीख टाकली होती.

तीस पुर्णांक नवू अठराशे सत्याण्णव. अशी तारीख कोण लिहितं अलीकडे? डिग्री एकोणीसशे बाराची आहे? साल चुकलेलं दिसतं.

आपल्या कल्पनेचं त्याला हसू आलं. डॉक्टर त्याच्या मनातील विचार वाचत असल्यासारखे मिस्कील निळ्या नजरेन त्याच्याचकडे पाहात होते.

"हं, सांगा तुमचा काय प्रॉब्लेम आहे? तुमच्या वडिलांनी कल्पना दिलीय फोनवरून."

"काय?"

"तुम्ही घराबाहेर पडत नाही. कुणाला भेटत नाही. एव्हढंच नाही तर तुम्ही कॉलेजलाही जात नाही. एम.बी.बी.एसच्या शेवटच्या वर्षाला आहात ना तुम्ही?"

"हो."

"तुम्हाला बाहेर का पडावं वाटत नाही?"

"भीती वाटते."

"सोशल अगरोफोबीया?"

तो मेडीकलचा विद्यार्थी असल्यानं डॉक्टर टेक्निकल भाषेत बोलले.

“तसं असतं तर मी रात्रीही बाहेर पडलो नसतो. मला जमावाची भीती वाटत नाही. मला.. उन्हाचा.. उजेडाचा त्रास होतो.”

“उजेडाचा ?”

“हो. मला वाटतं, माझं व्हॅम्पायरमध्ये रुपांतर होतं आहे.”

“कधीपासून असं वाटत तुम्हाला?” त्याच्या अपेक्षेविरुद्ध डॉक्टरांनी सीरियसली विचारलं.

“31 डिसेंबरच्या रात्री पासून.”

“हं..”

“पार्टी संपवून आम्ही घरी परतत होतो. तिघेजण. एका मोटरसायकलवर. आरडा-ओरडा करत. दारु प्यायलो होतो, मजबूत. रस्ता सुनसान होता. एव्हढयात आम्हाला रस्त्यावरुन खाली मान घालून जाणारी सुंदर तरुणी दिसली. तिचं सौंदर्य पाहून पुढे गेलेली मोटरसायकल मी मागे वळवायला सांगितली. तिच्याजवळ येताच मी तिला धरायला पुढे झालो. तिनं गल्लीत पळून जाण्याचा प्रयत्न केला, तिचा हात माझ्या हातात आला. तिला धरुन मी ओढणार तेव्हढ्यात तिने माझ्या हाताला पिरगळला आणि दुसऱ्या हातानी गळ्याला आवळले. तिचा अवतार पाहून माझे दोघं मित्र पळून गेले. तिनं माझा शर्ट फाडला. उघड्या खांद्यावर अणकुचीदार काहीतरी टोचल्याची जाणीव झाली. मला शुध्द आली तेव्हा पहाट झाली होती. रक्तदान केल्यावर येतो तसा थकवा जाणवत होता. कसाबसा मी घरी आलो. मित्र भेटायला आले तेव्हा त्यांनी सांगितलं, ती एक हडळ होती.

व्हॅम्पायर. तेव्हापासून आपलं व्हॅम्पायर मध्ये रुपांतर होतंय असं मला वाटतंय."

" तुम्ही हा भ्रम मनातून काढून टाका. तुम्ही अति दारु प्राशन केली होती, आणि ती तरुणी चवताळल्यामुळे भयानक दिसली असेल. व्हॅम्पायर ही लेखकांची कल्पना आहे."

"नाही डॉक्टर, हे बघा." त्यानं टी शर्टची कॉलर बाजूला ओढली. त्याच्या खांद्यावर तपकिरी रंगाचे दोन पंक्चर होते. "डॉक्टर, ऑपरेशन करताना रक्त निघालं की मी स्वतःवर कसा संयम ठेवतो ते माझं मलाच माहीत. समोर पेशंट आला की माझीं नजर त्याच्या मानेकडे जाते. वाटतं तिथं सुळे रुतवावेत. बघा, माझे सुळेसुद्धा लांब झाल्यासारखे वाटतात."

त्यानं वासलेल्या आ कडे डॉक्टरांनी लक्ष दिलं नाही.

"आत या." ते उठून आत गेले.

तो त्यांच्या मागे गेला.

खोलीतला अतिमंद प्रकाश पाहून त्याला बरं वाटलं. "बसा."समोरच्या गुबगुबीत खुर्चीकडे इशारा करुन डॉक्टर म्हणाले.

तो आरामदेही खुर्चीवर मान टेकवून बसला आणि लगेच समोरच्या कोपऱ्यात आढ्याला लटकलेलं वाघूळ बघून तो ताडकन उभा राहिला.

"ते होय. इमारत जुनी आहे ना. हाकलले तरी येतात वस्तीला. तुम्ही घाबरु नका. ते काही करीत नाही."

कपाटातून सीरिंज काढून त्यांनी त्याच्या दंडावर इंजक्शन दिलं.

“आता तुम्हाला रिलॅक्स वाटेल. जरा गुंगी येईल. तुम्हाला काही प्रश्न विचारायचे आहेत. ब्ला ब्ला ब्ला ब्ला.”

त्यानं होडीप्रमाणे हालणाऱ्या खुर्चीचे हात घट्ट धरुन ठेवले, की खोलीच गरगरतेय? डॉक्टरांचा चेहरा धूसर होत चालालाय. माय गॉड! ते वटवाघूळ त्याच्या खांद्यावर उतरलं. त्याला उडवून लावण्याऐवजी डॉक्टर पाळीव प्राण्यासारखे त्याच्या अंगावरुन हात कां फिरवत आहे?

अरे बापरे! तिनं हवेत सूर मारला. दुसऱ्या क्षणी एक तरुणी बनली.

कसलं इंजेक्शन दिलंय... कसले भास होताहेत?

“माय गॉड! तीच. डॉक्टर ही तीच आहे. 31 डिसेंबरला भेटलेली. तिला आवरा... ती माझे रक्त...”

डॉक्टरांनी तिला केस धरुन मागं ओढलं.

“मागे हो. गडबड करु नको. तुझा कट तुला मिळेल.”

डॉक्टरांचा श्वास त्याच्या खांद्याला जाणवला. ठसठसणाऱ्या जखमेत दोन सुळे रुतले.

नंतर त्याची शुद्ध हरवली...

§§§

12.काळं मांजर

किती अंधार दाटला आहे. बाळ, तू एकटी घरी कशी जाणार?

जाईन. आई जाते तशी.

आई कशी जाते?

काळ मांजर बनून.

§§§

13.अब्द-अब्द

आठ किलोमिटर्स पायपीट केल्यावर मी एकदाचा बसथांब्यावर येऊन पोहोचलो.

रात्रीचे आठ वाजून गेले होते. सभोवताली भकास माळरान, बोडक्या टेकडया. बुंध्याशी वेड्या-वाकडया सावल्या घेऊन उभी असलेली, भासमान आकार निर्माण करणारी, निष्पर्ण झाडं, खुरटी झुडपं. सडक, डावीकडून नदीच्या प्रवाहासारखी अचानक वळणं घेवून येत, वळसे घेत उजवीकडे विलीन झालेला. चंद्रप्रकाशात एखाद्या सुस्त अजगराच्या पाठीप्रमाणे चमकते आहे.

'विनंतीवरून बस थांबेल'

निष्पर्ण बाभळीच्या सावलीतल्या बोर्डवर चंद्राकवडश्याच्या हालत्या प्रकाशात बसचं चित्र ओळखायला येतं. म्हणजे असंच लिहिलेलं असणार. जवळ गेलं तर दिसेलही. पण गरज काय? सकाळी इथंच उतरून मी आत-आत कोणत्या-कोणत्या गांवत वसुलीसाठी हिंडलो होतो. माझी मोटारबाईक बिघडली नसती तर एव्हाना घरी पोहोचलो असतो.

मनस्ताप करण्यात अर्थ नाही. नोकरी आहे.

कुणाची तरी चाहूल लागली. मी वळून पाहीलं. कुणीतरी खेडूत उभा होता. चला, सोबत झाली.

"हॅल्लो!" सवयीनं इंग्रजीच येतं

“गाडीची वाट पहाता वाटतं?”

“हो. येईल ना?”

“येईल. कुणीकडे येणं केल होत?” बोलताना खेडूत बाभळीच्या सावलीत सरकला.

“वसूलीसाठी.”

बाभळीच्या जाळीदार चंद्रप्रकाशात त्याची सावली फासावर लटकलेल्या माणसासारखी दिसली.

मला एकदम दचकायला झालं.

“झाली की काही वसूली?” बाभळीच्या सावलीबाहेर येत त्यानं विचारलं.

“झाली थोडी फार.” माझं लक्ष त्याच्या सावलीकडेच होतं. आता त्याची सावली नैसर्गिक दिसत होती.

“तुम्ही इथलेच?” शांतता असह्य झाली म्हणून मी विचारलं.

“हो.”

“तुमच्याकडे कर्ज आहे काय?”

“तुमचं नाही. पण काय फरक पडतो? कुणी सुपात आहे, कुणी जात्यात आहे.”

बोलताना तो अस्वस्थ फेऱ्या मारत होता. माझं लक्ष त्याच्या सावलीकडेच होतं. तो बाभळीच्या सावलीत गेला की त्याच्या सावली मानेभोवती फास असलेली दिसायची. बाहेर आला की पूर्ववत व्हायची. हा प्रकार पाहून मी चक्रावलो.

एव्हढयात दूरून येणाऱ्या बसचे दिवे चमकले, आणि मी सुटकेचा निःश्वास सोडला.

मी बसमध्ये चढेपर्यंत खेडूत उभा होता.

“तुम्हाला नाही यायचं!” मी विचारलं.

“नाही, तुम्ही एकटे दिसले, म्हणून सोबतीला थांबलो होतो.”

डबलबेल वाजली. बस पुढे सरकली.

सीटवर बसून मी विचार करत होतो,

बाभळीच्या सावलीत दिसला तो खेडुताचा भूतकाळ होता की भविष्यकाळ?

§§§

14.काळ इथं थांबेल

आबा मोठा भविष्यवेत्ता आहे असं गावातल्या कुणाला वाटत नसलं, तरी गावकरी प्रश्न पाहण्यासाठी आबाकडे येतात. गावात तेवढाच एकच वृद्ध भट उरला आहे. आबाची मुलं शहरात राहतात. आबाचा खानदानी व्यवसाय भिक्षुकीचा.

तो प्रश्न पाहतो. कुणाची बकरी हरवली, वस्तू चोरीला गेली, गाय गाभण आहे, काय होईल? प्रश्न विचारल्यावर तो जुन्या काळ्या पाटीवर लेखणीनं आकडेमोड करून उत्तर सांगतो. उत्तर चुकलं तर गावकरी आपल्या नशिबाला बोल लावत अन् बरोबर आलं तर आबाचं कौतुक करतात.

कुणाची लेक-सून गरोदर असली; की लोक हमखास विचारतात, 'काय होईल?' तेव्हा आबा खात्रीनं सांगतो, 'हिला मुलगाच होईल.' कुणी जाब विचारायला आला तर मिस्किलपणे उत्तर देतो, '

अरे मी ज्योतिषी आहे, देव थोडाच आहे.'

त्यादिवशी मात्र आबा सकाळीच धोतराच्या काष्ठ्याला आग लागल्यासारखा हातातलं कॅलेंडर गावातला जो भेटेल त्याला दाखवत होता. उद्याच्या तारखेवर त्यानं लाल शाईनं वर्तुळ काढलं होतं आणि कळकळीनं सांगत होता,

"आजच इथून निघून गेलं पाहिजे. उद्या इथं काळ थांबणार आहे."

आबा भटाला वेड तर लागलं नाही? काळ का कुठं थांबत असतो? कुणी आबाला वेड्यात काढलं, कुणी खिल्ली उडवली. कुणी विचारलं, 'भटा, मग तू इथं काय करतोस?'

'मी गावकऱ्यांना सावध करतोय.' एवढं बोलून तो घाईनं पुढं निघून जाई.

दिवसभर गावात हाच गोंधळ चालू होता. त्याच्या पत्नीला कळालं तेव्हा तिनं त्याला बळजबरी ओढून घरी आणलं. तो तिलाही सांगत होता, "चल आटोप. काही बांधाबांध करू नको. उद्याचा काही भरवसा नाही. येथून निघून जाऊ."

डॉक्टरांनी घरी येऊन त्याला झोपेचं इंजेक्शन दिलं आणि उद्या शहरातल्या दवाखान्यात घेऊन जायला सांगितलं.

दुसरा दिवस उजाडला,

पण,

गावात कुणाला जाग आली नाही.

सूर्यकिरणं ढगात अडकून राहिली होती.

मध्यरात्री झालेल्या भूकंपानं जमिनीत गाडल्या गेलेल्या गावाकडे जगभरातून मदतीचा ओघ वाहत होता.

ढिगाऱ्या खाली दबलेल्या आबाच्या हातात आजच्या तारखेवर लाल वर्तुळ काढलेलं कॅलेंडर अजून तसंच होतं.

§§§

15.ते

“ते”

समाजात मानवाच्या रुपाने कळप करून राहतात

कळप म्हणजे समान अस्मिता असलेल्यांचा समूह.

त्यांची समानता आहे, “अज्ञान” व “अहंकार”

“ते”

समोर दिसणारी अनोळखी गोष्ट ते हेरतात.

घेरतात... कुरतडतात... पोखरतात...

नव्या विचारामुळे होणारा बदल त्यांना खपत नाही.

त्याला पाठीशी घालणाऱ्यांनाही ते संपवतात.

मग ते अनोळखी गोष्टीही संपवतात.

काहीही. वस्तू असो की विचार.

कळप त्यांची ताकद आहे.

अज्ञान त्यांची शक्ति.

त्यांना अंधारात सुरक्षित वाटते; उजेडाची भीती वाटते..

ते रक्तबीज आहेत.

मानवाच्या रूपाने ते आपल्या आजूबाजूला वावरतात.

जपुन रहा. नाहीतर ‘ते’ तुम्हाला कधी त्यांच्यात सामील करून घेतील तुम्हाला ही कळणार नाही.

कुणावर विश्वास ठेवू नका.

अगदी माझ्यावर ही. कदाचित्—

-- कदाचित् मी सुद्धा त्यातला एक असू शकतो.

§§§

16.वचनबद्ध

रात्री नऊ वाजता पूर्वसूचना न देता जाऊ नये एवढी माझी अन् प्रदीपची मैत्री औपचारीक नव्हती.

प्रदीप नी मी सातवीपासून ते ग्रॅज्युएटपर्यंतचे क्लासमेट. शिक्षण पूर्ण झाल्यावर आपापली मार्गक्रमणा करू लागलो. सुरुवातीला नियमित पत्रव्यवहार होता. पण जशी जीवनाची धकाधक वाढत गेली तसं अंतर वाढत गेलं, शेवटी संपर्क तुटला तो कायमचा.

रिटायर झालो तोवर सोशल मीडियाचं युग सुरू झालं होतं. आम्ही एकमेकांना शोधून काढलं. त्यानं आयुष्यात बराच पैसा कमावला होता. त्याची दोन्ही मुलं अमेरिकेत सेटल झाली होती. पत्नीच्या निधनानंतर तो एकटाच राहत होता.

आमच्या दोघांच्या बालमैत्रीला घट्ट बांधणारा धागा होता, भयकथा.

आम्ही चढाओढीनं भयकथा, गूढकथा व भूतकथा वाचत होतो. एकमेकांना वाचायला देत होतो. रात्र-रात्र जागून वाचलेल्या कथांवर चर्चा-चर्वण करीत होतो.

एका रात्री आम्ही असंच नुकत्याच वाचलेल्या भयकथेवर बोलत होतो.

“पण हे सारं खरं असेल का?” त्यानं किंचित घाबरतच विचारलं. “लेखकांना काही तसा अनुभव असेल का?”

चर्चा वाढत गेली पण निष्कर्ष निघत नव्हता, शेवटी प्रदीप म्हणाला,

“आपल्याला याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायचा असेल तर एक मार्ग आहे.”

“कोणता?”

“आपण दोघं वचनबद्ध होऊ या. दोघांपैकी जो आधी जाईल त्यानं मरणोत्तर दुसऱ्याला भेट द्यायची. म्हणजे आपोआप सिद्ध होईल, मृत्यूनंतर अस्तित्व आहे.”

मला हा सारा वेडेपणा आठवला आणि एकदम माझ्या मनांत मिस्किल कल्पना आली.

प्रदीपचा बंगला मुख्य रस्त्यापासून आत होता. गल्ली सुनसान होती. बंगला काळोखात बुडाला होता. स्ट्रिटलाईटचा प्रकाश होता, तेवढाच. त्या प्रकाशात, वाऱ्यासोबत डोलणाऱ्या बागेतल्या वेलींच्या, बंगल्याच्या भिंतीवर भीतीदायक आकृत्या नाचवत होत्या.

कर्रSSS आवाज करीत लोखंडी फाटक उघडलं. त्या आवाजानंच माझ्या काळजात चर्र झालं. फाटकाचा आवाज ऐकून कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज आला नाही म्हणून, बेधडक आत गेलो. पायऱ्या चढून दाराशी आलो.

बेल दाबणार, तेवढ्यात अचानक दार उघडलं!

दारात प्रदीप उभा होता.

मला माझ्या योजनेची आठवण आली. मी निर्विकार चेहऱ्यानं त्याच्याकडे पाहत उभा राहिलो.

“अरे व्वा! बरं झालं तू आलास. मी तुझ्याकडेच निघालो होतो. तू अचानक कसा आलास?”

मी भयपटातील एकसूरी थंड आवाजात बोलणाऱ्या गूढ पात्राची नक्कल करीत म्हणालो,

“आपलं ठरलं होतं ना प्रदीप, जो आधी जाईल त्यानं दुसऱ्याला भेटावं. आठवतं का तुला?”

“हो.” तो म्हणाला.

“आजच माझं निधन झालं,आणि ठरल्याप्रमाणे मी तुला भेटायला आलो.”

त्याच्या चेहऱ्यावर क्षणभर स्मीतरेषा तरळली.

“बरं झालं तू आलास. मला फार काळजी वाटत होती, माझं कसं होईल.”

“म्हणजे? काय झालं?” नाटक विसरून मी विचारलं.

“ये माझ्या मागं.”

जिन्यावरून तो मला बेडरूममध्ये घेऊन गेला आणि म्हणाला,

“आत बघ.”

मी आत डोकावलं. टेबललॅम्प जळत होता. प्रकाशाची तिरीप कॉटवर झोपलेल्या व्यक्तिच्या तोंडावर पडली होती.

पाहता क्षणी मी तिला ओळखलं,

तो प्रदीप होता!
गोंधळून मी वळून पाहिलं.
मागं कुणी नव्हतं!
खाली कोसळत असताना प्रदीपचे शब्द ऐकू आले,
होय, मृत्यूनंतर अस्तित्व असतं.

§§§

17.दुरूस्ती

सेकंड शो सुटला.

सोबत पायी चालणारे लोक आपापल्या वाटेनं निघून गेले. शेवटी सडकेवर तो एकटाच उरला. रात्रीची शांतता अंगावर चालून येत असल्यासारखी. थंडीमुळे कुत्री देखील पायात नाक खुपसून निपचित पडले होते.

घर अजून बरेच दूर राहिलेले. रिक्षा घ्यायला हवी होती, पण त्यानेच ते टाळलं होतं. घरी जाऊन तरी काय बिछान्यावर एकटंच पडून छताकडे पाहात झोपेची आराधना करायची. उद्या सुटीच आहे. नोकरीनिमित्त अनोळखी शहरात एकटं राहणाऱ्या जीवांना नकोशी वाटाणारी.

सेमेट्रीचे फाटक लागले.

तेथून गेलं तर फार मोठी चक्कर वाचेल, पण रात्रीच्या वेळी..?

नाही, भुताखेतांवर विश्वास नसला तरी ह्या वेळी स्मशानातून जाण्याची कल्पना रुचली नाही.

आकाशात पौर्णिमेचा चंद्र शितल प्रकाशाची उधळण करीत होता.

एवढा उजेड आहे. दोन मिनिटात रस्ता ओलांडता येईल. त्यानं पुन्हा स्मशानाकडे धाडसी नजर टाकून अंदाज घेतला. पानगळ झालेली, निस्तब्ध बोडकी झाडं निरूपद्रवी वाटत होती.

आयुष्यभर निरूपद्रवी जीवन कंठलेले जीव मेल्यावर कशाला कुणाला त्रास देतील? आपणही त्यांना डिस्टर्ब करायचं नाही. चोरट्या पावलांनी निघून जाऊ.

हां, आता भेटलीच एखादी, चित्रपटाच्या नायकाला भेटते तशी, भूतकालीन सुंदर तरुणी तर...

तो स्वतःशी हसला.

खुशीत त्यानं हातातलं थोटूक टिचकीनं भिरकावलं आणि साखळीनं कुलूप बंद असलेलं, पण एक माणूस घुसून जाऊ शकेल इतकं दोन दारात अंतर असलेल्या, फाटकातून तो आत शिरला.

थंडगार हवेचा झोत अंगावरून गेला.

बाहेरच्या अन् इथल्या थंडीत फरक आहे.

'हा मृत्युचा गारवा आहे.'

त्याच्या मनांत शब्द घुमले. परतायचं मनात आलं, पण त्यानं झपाट्याने मार्गक्रमणाला सुरवात केली.

एकाएकी तो थबकला.

ठक्...ठक्...ठक्...

कसला तरी एकसूरी ठक ठक आवाज येत होता. जणू कुणी छिन्नी-हातोड्यानं दगड कोरतंय. स्तब्ध उभं राहून ऐकल्यावर त्याची खात्री पटली, हा भास नसून खराच आवाज येतोय.

पुढं जाण्याची त्याची हिम्मत क्षणार्धात विरली. माघारी जाण्यासाठी तो वळाला तेव्हा त्याच्या लक्षात आलं, आपण सेमेंट्रीच्या

अगदी मधोमध उभे आहोत. फाटकापर्यंत जायला मागं जेवढं अंतर कापावं लागेल तेवढंच पुढे आहे.

आवाजाची दिशा नेमकी कुठं स्पष्ट आहे? फाटकाच्या बाजूनंच येत असेल तर? गुपचूप सरळ जावं.

त्यानं सावधपणे चालायला सुरवात केली.

दहा एक पावलं गेला असेल, त्याला कबरीवर लावलेल्या संगमरवरी दगडावर छिन्नी हातोड्यानं कोरणारा माणूस दिसला.

त्याला पाहून त्याने सुटकेचा निःश्वास टाकला. क्षणापूर्वीच्या वाटलेल्या भीतीचं हसू फुटलं. थबकून तो कारागिराला म्हणाला,

“मध्यरात्री एकटाच कसलं काम करतोस, मित्रा?”

“काही नाही,” हातातलं काम थांबवून तो म्हणाला, “त्यांनी दगडावर माझं नाव चुकीचं लिहिलं ते दुरूस्त करतोय.”

§§§

18.सावली

रात्रीचा किती वाजला होता याचा मला अंदाज नव्हता. नवी कथा लिहिताना असंच होतं. सुचत जातं आणि काळवेळेचं भान हरपून लिहित राहतो.

विचार अडखळला. लेखणी थबकली.

विचार का अडखळला?

मागच्या बाजूनं कसली चाहूल लागली

वळून पाहिलं तर

आरामखुर्चीवर काळी आकृती.

कोण!

तुझी सावली. रोज मी तुझ्याबरोबर असते, आज तू माझ्यासोबत चल.

कुठं?

अंधारात.

§§§

19.टाईम मशिन

भूतकाळातला माणूस कधी तुमच्या घरी आलाय?

आमच्या घरी आला होता.

सुटी असली की पिकनिकला आम्ही भूतकाळात जातो.

यावरून आमचे वाद होतात. ह्याला भूतकाळात जायला फार आवडतं. मला आपलं वर्तमानातच कुठल्या तरी स्पॉटला जायचं असतं. अगदी फार झाल तर नजीकच्या भविष्यात एखादी चक्कर टाकली तरी चालतं.

भविष्यात फार लांब जाता येत नाही. गेलो तरी तिथली लेटेस्ट टेक्नालॉजी समजत नाही. एखाद्या खेडवळ माणसासारखी अवस्था होते. उद्याची एखादी वाईट बातमी कळण्याचा धोका असतोच. उगाच सुटीचा मूड बिघडतो, म्हणून त्याला भविष्यकाळात जायला नाही आवडत.

माझं म्हणणं- भविष्यातच काय भूतकाळातलं तरी आपल्याला काय कळतं? त्याचा आवडता काळ म्हणजे 1974. त्यावेळी तो कॉलेजला होता ना. एक-दोनदा त्यानं कॉलेजच्या बाहेर उभ राहून त्याच्या मैत्रिणी दाखवल्या. त्याबद्दल माझा आक्षेप नव्हता. पण त्रास किती.

एकदा फोन करायची वेळ आली. मोबाईल नेटवर्क असण्याचा प्रश्नच नव्हता. कुणाला विचारावं? तेवढ्यात एक म्हातारा दिसला.

त्यानं सांगितलं, पब्लिकबूथवरून फोन करता येईल. तो कसा करायचा? विचारल्यावर त्यानं माझ्या मॉडर्न ड्रेसकडे आश्चर्यानं पाहिलं, स्वतःशी पुटपुटत त्यानं मला कॉल कसा करायचं ते दाखवलं.

किती अवघड! फोन कानाला लावा, ट्युँई आवाज आला की रुपयाचं नाणं बॉक्समध्ये टाका मग फोन लागणार. बोलणं कंटीन्यू करायचं असेल तर पुन्हा-पुन्हा रुपया बॉक्समध्ये टाका.

रेल्वे रिझर्वेशनची फजितीच वेगळी. काऊंटर क्लर्कने कसलातरी फॉर्म हातात दिला. कसा भरायचा देवजाणे! पुन्हा तोच म्हातारा कामास आला. यावेळी त्यानं आमच्या आधुनिक कपडयांकडे पाहून आश्चर्य व्यक्त केले नाही. तो मागावर असल्यासारखा अधून-मधून दिसायचा. मी नवऱ्याला बोलले. त्यानं चक्क दुर्लक्ष केलं.

एक दिवशी दारावरील बेल वाजली. दार उघडलं तर बाहेर तोच म्हातारा!

कसं शक्य आहे. 1975सालातला. 2016 मध्ये कसा येईल?

'ओळखलं का?' मी नकळत मान डोलावली. 'आत येऊ का?' मी बाजूला सरकले.

सोफ्यावर बसत तो म्हणाला,

'मी 2016 बघायला आलो होतो. अचानक माझ्याकडील कॅश पंतप्रधानाने अवैध ठरविली. जेवायला खायला पैसे नाहीत. तुम्ही काही मदत करा. तुम्ही मला ओळखता. मी तुम्हाला अनेकदा मदत केलेली. आपल्या तोंडून सांगताना संकोच वाटतो. तुम्हाला आठवत असेलच.'

आठवत होतेच. मनात प्रश्न होता हा इथं कसा?

'मी इथं कसा? तुम्हाला प्रश्न पडला असेल ना?' तो हसला, ' तुमचा पोशाख आणि अज्ञान पाहून माझ्या लक्षांत आलं, काहीतरी गडबड आहे. तुमच्या मागावर राहून तुमच्या टाईम मशिनची माहिती मिळवली. त्याची कॉपी करून आलो 2016 मध्ये मौज पहायला. पण दुर्देव बघा, आजच तुमच्या पंतप्रधानांनी माझ्याकडे असलेल्या नोटा रद्द केल्या.'

त्याला 1975 सालात परत जायला मदत करण्याशिवाय माझ्याकडे काय पर्याय होता?

§§§

20. ऐन दुपारी

स्मशानातून आल्याचा पश्चाताप झाला. मोठा फेरा वाचवण्याच्या मोहानं आपण हा रस्ता घ्यायला नको होता.

त्यानं रिस्टवॉचवर नजर टाकली. पाऊण वाजत होता.

अरे बापरे!

त्यानं स्मशानात बाराच्या सुमारास प्रवेश केला होता. म्हणजे तो चक्क पाऊण तास चालत होता! अशक्य. आपल्या घड्याळात काहीतरी बिघाड झाला म्हणावं तर सेकंद काटा पुढे सरकतोय.

ही काही त्याची शेतावर जाण्याची वेळ नव्हती.

आज सर्वपित्री असल्यानं पूर्वजांना जेऊ घालेपर्यंत घरी राहणं भाग होतं. शेतावरील गडी, घरी श्राद्ध असल्यानं येणार नव्हता. जनावरांना चारापाणी करणं भाग होतं म्हणून जेवणं झाल्याबरोबर टळटळीत उन्हाचा तो बाहेर पडला. त्याचा शेतीवर भारी जीव. ती मिळवण्यासाठी त्यानं प्रत्यक्ष चुलत्याचा...

निदान आज तरी त्याची आठवण नको. हातून घडू नये ते घडलं. आता पश्चाताप करून काय उपयोग? म्हातारा जिवंत राहता तर शेती-वाडी परस्पर कुणाच्या नावावर करून देता. माणसाचा काय भरोसा?

निमित्त आजाराचं होतं. डॉक्टरांनी औषध दिलंच होतं, फक्त डोस कमी जास्त करायचा, एवढंच. मरताना चुलत्याच्या ध्यानात आलंच. तळतळून तो म्हणाला, 'पचू देणार नाही मी तुला.'

दोन साल उलटली तरी सल अजून कमी होत नाही. रात्री झोप येत नाही. अंधारात चाहूल लागली की धस्स होतं.

आजच वारस म्हणून श्राद्ध घातलं. हात जोडून विनंती केली, 'काका, लेकराची चुकी पदरात घ्या.'

चालता-चालता तो क्रिश्चन दफनभूमिजवळ आला. इथून गेलं तर शॉर्टकट आहे. सवयीनं त्यानं ती वाट धरली.

तो फाटकातून आत शिरला तेव्हा दुपारचे बारा वाजले होते.

आणि आता पाऊण वाजला होता.

स्मशानाच्या ह्या टोकापासून ते त्या दुसऱ्या टोकापर्यंतचं अंतर ओलांडायला पाच मिनिट म्हणजे खूप झाले.

तो पंचेचाळीस मिनिटांपासून चालत होता!

त्यानं आल्यावाटेनं परत फिरण्याचा प्रयत्नही केला, पण दरवेळी फाटकाऐवजी क्रुर-कठोर दगडी भिंत समोर येई.

असं का होतंय? वाटेत न वळण, न खाच खळगा. सरळसोट रस्ता. मग नेमकी भिंत कशी आडवी येते?

भिंत आडवी येते ती परतीच्या वाटेवर.

फाटकापासून सरळ चालत जावं तर रस्ता सरत नाही.

रस्ता मागं सरण्याऐवजी पुढे तर सरकत नाही?

काय विचित्र विचार!

चकवा!

अचानक तो जागेवर थबकला.

त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना,

थडग्यातून वर आल्यासारखा चुलता बीडी ओढत, बुझगावण्यासारखा सरळ उभा होता. एखाद्या स्क्रूसारखी मान चुलत्याची मान त्याच्या दिशेनं फिरली.

तो घाबरला. घामाघूम होऊन तो जागेवरच थरथरत उभा राहिला. चुलत्याच्या नजरेस पडू नये म्हणून इकडे तिकडे जागा शोधू लागला. जवळपास झाड, झुडूप काही नव्हतं.

त्याची नजर नुकत्याच खोदून ठेवलेल्या खड्ड्यावर पडली. कबरीतून उठलेल्या मुडद्याच्या नजरेतून सुटण्यासाठी ह्यापेक्षा दुसरी जागा कोणती असू शकेल? चुलत्याची नजर पडण्याआधी वेगानं धावत त्यानं खड्ड्यात उडी मारली.

खड्डा अपेक्षेपेक्षा खोल होता. गडबडीत त्याच्या पाय मुरगळला. तीव्र वेदना झाली, पण चुलत्याला लपण्याची जागा समजू नये म्हणून त्यानं हातनं तोंड दाबून धरलं.

तो गर्भगळीत होऊन, अंग चोरून बसून राहिला. डोळे किलकिलेकरून वर पाहिलं. सीमित परिघात सूर्य प्रखर तेजानं तळपत होता.

पाय घासत चालणाऱ्या पावलांचा हलका आवाज ऐकून त्याच्या शरीरातून थंडगार लहर दौडत गेली. केस उभे राहिले.

तो आपल्यालाच तर शोधतोय.

पावलांचा आवाजजवळ येत होता.

भर दुपारी त्याला हुडहुडी भरली.

सरपटणाऱ्या पावलांची चाहूल खड्याच्या काठावर येऊन थांबली.

दोन्ही हातांनी चेहरा झाकून गुडघ्यात लपवला. वर मान करून पाहण्याची हिम्मत झाली नाही.

त्याच्या तोंडून आर्त किंकाळी बाहेर पडली.

वरून चुलता माती लोटत होता...

...आणि तो हळूहळू मातीच्या ढिगाऱ्यात गाडला जात होता.

§§§

21. व्हॅलेंटाईन.

गॅलरीत उभा असताना मी ते दृष्य पाहिलं
घाबरून धावतच घरात आलो.
कसाबसा सेक्युरिटीला फोन लावला
फोन लावताना हात थरथरत होता.
हॅल्लो, सेक्युरिटी, मी डि ब्लॉक, सातशे पाचमधून बोलतोय.
आत्ताच मी एफ ब्लॉकच्या टेरेसवरून एका स्त्रीला खाली उडी मारताना पाहिलं.
गार्डवर काही परिणाम झालेला दिसला नाही,
तो शांतपणे म्हणाला,
आज व्हॅलेंटाईन डे आहे साहेब, दरवर्षी ती आजच्या दिवशी अशीच उडी मारते.

§§§

22.माझे पाय पाहिलेस का?

धिम्या गतीनं चालत येऊन शेवटची लोकल एक नंबर प्लॅटफार्मवर प्रवेशती झाली तेव्हाच प्रवासी उभं राहून आंबलेल्या शरीराला आळोखे पिळोखे देऊ लागले. दारात उभं असलेले प्रवाशांनी वेग संथ होताच प्लॅटफार्मवर उड्या मारायला सुरुवात केली.

दीड तासात सी एस टीहून पोहचणारी लोकल तीन-साडेतीन तासानंतर प्लॅटफार्मला लागत होती. दोन दिवसांच्या संततधार पावसानं सारं जनजीवन विस्कळीत करून टाकलं होतं.

तुम्ही डब्याच्या मध्यभागी बसलेले असता. दोन्ही दारं सारख्या अंतरावर असलेली तुमची नेहमीची जागा. इतक्या वर्षांची अप-डाऊनची सवय. तोच डबा, तीच विंडोसीट, तोच ग्रुप. काही मेंबर रिटायर झाले, तर काही जगातच नाहीत.

म्हणजे पत्ते खेळताना मृताच्या संपर्कातला कुणी असेल तर माहिती शेयर करतो. बातमी ऐकून थोडी हळहळ व्यक्त केली जाते. पत्ता उचलणारा हात थबकतो. तसा बाजूला त्याला ढोसून सांगतो, पत्ता टाक. क्षणभराचा गहीवर दूर होतो. पत्त्याचा गेम पूर्ववत सुरु होतो. जीवन कुणासाठी थांबत नाही.

लोकलची एकसुरी घरघर बंद होते. दिवे विझतात. पंख्यांची वीजे विनाची अंतिम घरघर चालू असते. डब्यात तुमच्याशिवाय कुणीच नसतं. सर्वत्र अंधार. तुम्हाला काही फरक पडत नाही. एवढ्या वर्षांच्या

सवयीनं तुम्ही नेमकेपणानं दाराकडे जाता. उघड्या दारातून येणारा चौकोनी प्रकाश तुम्हाला वाट दाखवतो.

बाहेर रिमझिम चालूच आहे. भराभर बाहेर पडलेले पॅसेंजर्स शेवटच्या लोकलची वाट पाहणाऱ्या रिक्षा घेऊन निघून गेले. तुम्ही बाहेर येता तेव्हा रिक्षा स्टँड रिकामा असतो. पानटपरीवाल्यानं नुकतेच दिवे मालवले. एवढ्यात फर्र करून रिक्षा समोर उभी राहिली.

"कुठं जायचं?"

"कोनला."

रिक्षावाला मान हालवतो आणि पाणी उडवत निघून जातो.

तुम्ही संभ्रमात उभे राहता. एवढ्यात तुमच्या कानावर आवाज येतो.

"कोन?"

इतका वेळ न दिसलेली अंधारातली रिक्षा दिसते.

"कोनला जाणार?" तुम्ही संशयानं विचारता.

"कोनचीच रिक्षा आहे." तो सांगतो.

खात्री पटल्यावर तुम्ही रिक्षात बसता. तो रिक्षा सुरू करतो. वाऱ्यानं अंगावर उडणारे पावसाचे तुषार अंगावर घेत तुम्ही सीटवर डोकं टेकवून निवांत डोळे मिटता. तुमची हालत ओळखून रिक्षावाला काही बोलत नाही.

गाव सोडून रिक्षा खाडीच्या पुलावर आली हे तुम्हाला अनुभवानं कळतं.

अचानक रिक्षा भस्सकन डाव्या बाजूला जाते. तुम्ही कुतुहलानं डोळे उघडता.

एवढ्या रात्री कुणीतरी रिक्षाची आशा सोडून पायी निघालेला प्रवासी रिक्षेला हात दाखवत असतो.

भाड्याच्या आशेनं रिक्षा त्याच्याजवळ जाऊन थांबते. अगदी क्षणभर.

"कोन..."

त्याचं बोलणं पूर्ण होण्याआधी रिक्षावाला गियर टाकून रिक्षा दामटतो.

जणू त्याला त्या पॅसेंजरपासून शक्य तितक्या लवकर दूर जायचं होतं. पावसात भिजणाऱ्या पॅसेंजरची दया येऊन, तुम्ही विचारता,

"कां घेतलं नाहीस रे बिचाऱ्याला? तुलाही भाडं मिळालं असतं."

"अहो साहेब, तुम्ही त्याचे पाय पाहिले नाहीत. उलटे होते."

घाम पुसत रिक्षावाला म्हणतो.

तुम्हाला हसू आवरत नाही.

"काय झालं?" तो गोंधळून विचारतो.

"त्याचे पाय तू पाहिलेस, माझे पाय बघितलेस कां?"

§§§

23.कशासाठी

त्यानं धाड्कन बंद केलेला दरवाजा जणू माझ्या हृदयावर आपटला.

अपमान, दुःख आणि पराजित मनानं सून्न होऊन मी सोफ्यावर बसून राहिलो. दारापर्यंत जाऊन त्याचा अखेरचा निरोप घेण्याची इच्छा उरली नव्हती.

आमच्यातलं प्रेम आमच्या सह्यांनी आटून गेले.

सह्या करण्याआधी आम्ही एकमेकांना वाग्बाणांनी घायाळ केलं. जितके वार त्याने केले तितके मीही केले. कुणी कुणाच्या मनावर खोल जखमा केल्या सांगता आलं नसतं.

घरात आमच्या दोघांशिवाय कुणी नव्हतं.

त्यानं फोन करून भेटायला येणार असल्याचं सांगितलं, तेव्हाच मी बायको मुलांना माहेरी पाठवलं.

माझा अंदाज खरा ठरला. तो पूर्ण तयारीनिशी, कागदपत्र घेऊनच, आला होता. माझ्या समोर पेपर्स ठेऊन तो म्हणाला,

“दोन मिनिटांच काम आहे. फक्त ह्यावर सह्या कर. आपले संबंध चांगले आहेत (?) गोडीनं वेगळे होऊ या. उगाच वाद कशाला?”

ते कागद मी वाचावे या मताचा तो नव्हता. वाचताना माझा पारा चढत गेला. पूर्ण वाचण्याआधीच मी तो कागद भिरकावला.

“ह्यावर माझी सही मागतोस? भाऊ आहेस की वैरी!”

‘वैरी’ शब्दापासून सुरवात झाली.

आक्रस्ताळेपणा करण्याऐवजी मी नम्रपणे नकार देऊन चर्चा करण्याचा प्रयत्न करायला हवा होता. पण मला माहीत होतं, बायकोच्या बुद्धीनं काम करणारा, तो कसली चर्चा करणार? त्याचा एकच हेका,

“मी तुझ्यासाठी एवढं केलं, शेवटी तू सापासारखा उलटलास. वाटणीत थोडं कमी-जास्त झालं तर कुठलं आकाश कोसळलं?”

मी त्याला वैरी म्हणालो, तो मला साप म्हणाला.

आम्ही दोघं सख्खे भाऊ. एकाच गर्भातून आलो, एकाच ताटात जेवलो, एकाच संस्कारात वाढलो, आणि आज एकमेकांवर विषारी फुत्कार टाकत होतो.

शेवटी लहानपणी जे व्हायचं तेच झालं. मी दाखवत नसलो तरी, मला त्याची अगतिकता व्याकुळ करीत होती. त्याच्या म्हणण्याप्रमाणे मी सह्या केल्या नाही तर त्याची बायको त्याचं जगणं मुश्किल करुन टाकेल.

शेवटी मी सह्या केल्या. भिकाऱ्याला भीक द्यावी तसे त्याच्या अंगावर कागद भिरकावले.

इच्छा नसताना माझी नजर त्याच्या चेहऱ्यावर गेली. मला वाटलं, तो लहानपणीसारखं, विजयी स्मीत करील. त्याचा दीनवाण्या चेहऱ्यावर अपराधी भाव तरळून गेले.

क्षणभर वाटलं, त्याला मिठीते घेऊन सांगावं, 'जाऊ दे रे. पैसा अडका. तू नाराज नको होऊस.' दुसऱ्याक्षणी अहंकार फुत्कारला.

"झालं ना मनासारखं! निघ येथून. पुन्हा तुझं थोबड दाखवू नकोस."

त्याचं अपराधी मन माझ्या शब्दांनं कठोर झालं.

"मी मेलो तरी तोंड पाहायला येऊ नकोस.''

तिरीमिरीनं तो धाडकन दरवाजा बंद करुन निघून गेला.

सगळा राग काढावा तशी त्यानं मोटरसायकलला किक मारलेली ऐकू आली. जखमेतून रक्तस्त्राव व्हावा तसा मनात दुःखस्त्राव होत होता.

कितीवेळ सर्वस्व हरलेल्या जुगाऱ्यासारखा तसाच बसून होतो.

दारावरील बेल वाजली.

"काय राहिलं अजून?" मी आढ्यतेनं विचारलं.

"तुझी माफी मागायला आलो." तो इतक्या सहजतेने म्हणाला की मी आ वासून पाहातच राहिलो.

"तुझा विश्वास बसणार नाही. खरं सांगू का? संपत्ती, पैसा-अडका सगळी माया आहे. आयुष्य क्षणभंभूर आहे." तो विचित्र हसला. "माझ्याकडे जास्त वेळ नाही. सुटकेसमधले तुझ्या सह्याची कागदपत्र कुणाच्या नजरेस पडण्याआधी काढून घे."

"सुटकेस कुठंय?"

बोलणं पूर्ण व्हायच्या आत तो निघून गेला.

मी धावत बाहेर आलो.

तो मला दिसला नाही. इतक्यात तो कुठे गेला असेल? छे! भासच असावा. तो आला असता तर मोटरसायकलचा आवाज नसता का आला?

मनाची समजूत घालत मी आत आलो. एव्हढयात फोन वाजला.

“हॅल्लो?”

गस्ती पोलीस बोलतो साहेब. एम. एच. ** ओ सी ***गाडी ओळखीची आहे का?”

“ काय झालं?”

“लवकर या साहेब, गाडीचं स्टँड काढलं नव्हतं. स्पीड ब्रेकरला आदळून गाडी उडाली. दुसऱ्या बाजूनं वेगात ट्रक येत होता.”

मी आवंढा गिळला.

“तो कसा आहे?”

“सॉरी साहेब, ते ऑन द स्पॉट गेले.”

§§§

24.रिव्हर्स डिलेव्हरी

10/08/1961 डेट ऑफ बर्थच्या कॉलममध्ये काळजीपूर्वक जन्मतारीख लिहिली.

पासष्ट वर्षाच्या आयुष्यात जन्मतारीख लिहिण्याचा अनेकदा प्रसंग आला. प्रत्येक वेळी दुसऱ्यांदा तपासून पाहण्याची सवय लागली.

पुढचा फॉर्म भरायला सुरवात करणार, एवढ्यात बेल वाजली.

दारात कुठल्याशा कंपनीचा युनिफार्म घातलेला डिलेव्हरी बॉय.

'रिटर्न पिकअप आहे साहेब.' तो खर्जातल्या सुरात म्हणाला. त्यानं हातातली मारवाडी चोपडी उघडून पाहिली आणि म्हणाला,

डिलेव्हरी डेट, दहा ऑगस्ट एकोणीसशे एकसष्ट.

वेडाच दिसतो.

असं रेड्यावर बसून येतं कुणी आजकाल!

§§§

25.उत्तररंग

शेवटी रंगनाथराव गेले.

गोपिकाबाई त्यांना निरोप देण्यासाठी फाटकापर्यंत गेल्या. श्रीराम जय राम जय जय रामचा स्वर ऐकू येईनासा होईपर्यंत फाटक धरून उभ्या राहिल्या.

रंगनाथरावांच्या जाण्यानं त्यांना धक्का बसला नाही. जाणार होतेच. चार-सहा महिन्यांपासून सदैव अंथरूणावर पडून असायचे. त्यांची देखभाल गोपिकाबाईंनी न कंटाळता सेवाभावी वृत्तीनं त्यांची देखभाल केली.

गोपिकाबाई घरातली काम आटोपली की त्यांच्याजवळ जाऊन बसत. अंग मोडून आलं की त्यांच्या शेजारी डुलकी घेत. कधी त्यांच्या शेजारीच अंग चोरून तर कधी त्यांच्या आरामखुर्चीवर.

त्या रंगनाथरावांच्या आरामखुर्चीवर कधीच बसायच्या नाही. रंगनाथराव बाहेरगावी गेले असले तरीही. अलीकडे रंगनाथरावांचं खुर्चीवर बसणं बंदच झालं होतं. सदानकदा अंथरूणावर पडून राहायचे.

एकदा, रंगनाथराव कुठली तरी जुनी आठवण सांगण्यात रंगून गेले होते, उभं राहून पायांना कळ आली, म्हणून त्या आरामखुर्चीला टेकल्या. रंगनाथराव बोलणं थांबवून त्यांच्याकडे पाहू लागले. गडबडीनं उभं राहत त्या पुटपुटल्या, 'अनावधानानं झालं हो.'

‘असं का बोलतेस?’ ते म्हणाले, “ आता तुझीच आहे ती खुर्ची. आता काही मी खुर्चीवर बसायचा नाही.’

‘नका असं अभद्र बोलू. वाटेल तुम्हाला बरं.’

ते केवळ हुंकारले.

त्यांची नजर गरगरणाऱ्या पंख्यावर स्थिरावली. ते सांगत असलेली आठवण तशीच अर्धवटच राहिली.

त्यांना काय आठवत असेल?

गोपिकाबाईंना प्रश्न पडे. आजकाल ते तिच्याशी मवाळपणे बोलतात. गतकाळाच्या मधूर आठवणी सांगतात. तिच्याबद्दल इतकं चांगलं बोलतात की, गोपिकाबाईंना त्यांचं बोलण निरोप समारंभाचं भाषणासारखं वाटायचं.

निरोप समारंभात कटू आठवणी सांगायच्या नसतात !

म्हणून का ते माझ्याशी सौजन्याने वागत होते? त्यांच्या वागण्या-बोलण्यात येत गेलेला अलिप्तपणा गोपिकाबाईंना जाणवायचा.

सुरवातीला त्यांनी तिकडं दुर्लक्ष केलं. एरवी रंगनाथरावांकडे दुर्लक्ष करण्याची त्यांना सवय होती. आजवरच्या संसारात त्यांनी आपलाच हेका चालविला होता. रंगनाथरावांच्या मनाप्रमाणे काहीच होऊ दिलं नव्हतं.

तरूणपणी रंगनाथरावांना व्यवसाय करायचा होता. त्यांच्या मनांत अनेक कल्पना आकार घेत. गोपिकाबाईं, त्यांना उत्तेजन देण्याऐवजी भीती दाखवत.

त्यांना भीती वाटायची, जर ह्यांना अपयश आलं तर काय अवस्था होईल? रंगनाथरावांना त्यांची भीती कळायची. त्यांना दुःख व्हायचं. आपल्या कर्तृत्वावर आपल्या पत्नीचा विश्वास नाही! यशस्वी पुरुषांच्या पत्नींकडे पाहून रंगरावांना आपल्या दुर्दैवाचं वैषम्य वाटायचं.

आपली काय अवस्था होईल ही भीती रंगनाथरावांना कधीच वाटली नाही. एकत्र कुटुंब असल्यानं चूल पेटण्याचा प्रश्न नव्हता. ही गोष्ट गोपिकाबाईंच्या ध्यानात आल्यावर तेव्हा त्यांनी, रंगनाथरावांना त्यांच्या कुटुंबापासून तोडलं. तोडलंच.

व्यवसायाचं खूळ त्यांच्या डोक्यात अधूनमधून डोकं वर काढायचं.

एरवी अविचारानं, बेहिशेबीपणे घरात पैसे खर्च करायचे. स्वतःच्या संसाराचं गणित त्यांनी कधीच मांडलं नाही. जोपर्यंत ह्या गोतावळ्यात राहतील तोपर्यंत त्यांना व्यवहार समजणार नाही. भविष्याचा विचार करून गोपिकाबाईंना तसं वागावं लागलं.

रंगनाथराव किती कळवळले होते! पण गोपिकाबाई आपल्या विचारावर ठाम होत्या. त्यांनी निर्दयपणे रंगनाथरावांना मायेच्या-प्रेमाच्या लोकांपासून तोडलंच.

आपल्या निर्दयी वागण्याची ह्यांना आठवण येत असेल?की कॉलेजमधल्या मैत्रिणी सोबत घालवलेले हळवे क्षण आठवत असतील?

भेट होताच दोघांचे चेहरे फुलायचे. गोपिकाबाईंच्या असुरक्षित मनांन धोक्याचा इशारा दिला. तिला तोडायला हवी. एवढंच त्यांना समजलं. जाणूनबुजून रंगनाथरावांसमोर त्यांनी तिचा अपमान केला. वाक्य निरूपद्रवीच होतं, उच्चार भेदक होते. बिचारी..मानिनी मैत्रीण पुन्हा कधी दारात उभी राहिली नाही.

रंगनाथरावांनी घरात तिचा विषय काढला तरी त्या आदळआपट करीत. वाद टाळण्यासाठी रंगनाथरावांनी तो विषय हद्दपार केला.

विषय बोलण्याचा बंद झाला तरी मनांत घोळतच असणार ना!

त्यांच्यावर हक्क सांगणाऱ्या प्रत्येकाला गोपिकाबाईंनी तोडलं.

त्यांच्या भोवती कुंपण घालून आत कुणी येणार नाही याची दक्षता घेतली.

रंगनाथराव एकटे-एकटे होत गेले.

पत्नीशिवाय अनेक नात्याची माणसाला गरज असतेच ना!

मात्र गोपिकाबाईंना असा विचार कधी शिवला नाही.

एकेका प्रसंगानंतर ते गोपिकाबाईंपासून दुरावत गेले.

अलीकडे तर असं वाटत होतं, ते केवळ कर्तव्य भावनेनंच तिच्याशी वागतात. तिच्याशी बोलताना त्यांची नजर स्निग्ध असते, पण अचानक एखाद्या बेसावध क्षणी त्यांच्याकडे पाहवं तर नजरेतून दाहक तिरस्कार ओसंडत असतो. अंगावर शहारा येई. बाई! केव्हापासून हे असं पाहात असतील माझ्याकडे? नजरानजर होताच बटन दाबावे तशी त्यांची नजर स्निग्ध होई.

बोललेच तर सुखद् आठवणी सांगत.

कडवट आठवणी कुठे असतील?

त्यांना आठवत नसतील की, त्या पाण्यातल्या गाळासारख्या त्यांच्या मनाच्या तळाशी बसल्या?

सुखद आठवणी सांगून मन रितं झालं की उरेल तो फक्त गाळ...द्वेष...मग त्या निखळ धगधगत्या द्वेषाचं काय होईल? तो त्यांच्यासोबत जाईल की इथंच रेंगाळेल, सूड घ्यायला...

असला भीतीदायक विचार मनातून झटकायला त्या आवेगानं वळाल्या...

दाराच्या उंबरठ्यावर रंगनाथराव क्रुद्ध मुद्रेनं तिच्याकडे पाहत होते.

दृष्टादृष्ट होताच ते विकृत हसले.

‘ ये अशी गोपिका, तुझ्या आयुष्याचा उत्तररंग सुरू झालाय.’

§§§

26.जित्याची खोड

"सिग्रेट ओढायला आलात कां?"

हॉस्पिटलच्या शौचालयाच्या अंधाऱ्या कोन्यात गेल्यावर कुणाचा तरी दबल्या आवाजात प्रश्न आला, तसा तो दचकला. अंधारात फक्त मानवाकृति दिसत होती.

"घाबरू नका." तो कुजबुजला. "मला ही सिग्रेट हवीय. आहे कां?"

त्याने सुटकेचा श्वास सोडला. चोरी पकडणाऱ्याला वाटा द्यावाच लागतो.

"इकडे कुणी येत नाही. आलंच तर मी सूचना देईल." पेटलेली सिग्रेट घेत तो म्हणाला, तसा सिग्रेट ओढायला आलेला रिलॅक्स झाला.

एक झुरका घेऊन समाधानाचा धुर सोडीत तो म्हणाला,

"जिथं तिथं 'नो स्मोकिंग'ची पाटी. पाट्या लिहायला काय जातं हो! केव्हाची तलफ लागली होती. ज्यांना धुम्रपानाची सवय त्यांना ७कळतं. म्हणतात ना, जित्याची खोड मेल्या शिवाय जात नाही."

खोट आहे ती व्यक्ती कुजबूजली,

जित्याची खोड मेल्यावर ही जात नाही.

(हंस दिवाळी अंक-2017)

§§§

27.धडा

बेडूक.

चांगला गलेलठ्ठ. हिरव्या रंगाचा. त्याच्या जवळून उडत जाणारी पाकोळी त्यानं बसल्या जागेवरून जीभ बाहेर काढून गिळंकृत केली नसती तर त्याचं अस्तित्वही जाणवलं नसतं.

सूर्य मावळला. तिन्हीसांजेचा दुधाळ प्रकाश भरून राहिलेला. शेतमजूरांची घरी जाण्याची लगबग सुरू आहे.

भाऊ कित्येक दिवसानंतर शेताला भेट द्यायला आलेले. बांधावरच खुर्ची मांडून पायावर पाय चढवून बसलेत. आदबीनं पायाशी बसलेल्या गड्याशी बोलताना त्यांची नजर शेतात काम करणाऱ्या त्याच्या नवविवाहितेच्या मोहक हालचालींवर खिळलीय.

एके काळी भाऊही शेतावर राबले. भाऊंचे वडील इथं गडी म्हणून राबायचे. भाऊ राजकारणात गेले. सरपंच झाले, सभापती झाले आणि पुढच्या निवडणूकीत आमदारकीचं तिकिट मिळविणार आहेत.

साहेब राजकारणा पायऱ्या चढून वर जात होते, तसा त्यांचा दरारा वाढत चाललेला. ज्या शेतात राबले ते आज त्यांच्या मालकीचं आहे. बोलणारे बोलतात, पण जुन्या मालकानं शेत विकताना लिहून दिलं होतं, मी स्वखुशीनं कुठल्याही दबावाला बळी न पडता, नशापाणी न करता लिहून देतो...

साहेबांनी शेत घेतलं आणि शेजाऱ्यांनी आपले बंधारे पुन्हा आपल्या हद्दीत घेतले.

पुन्हा एक पाकोळी बेडकाभोवती भिरभिरू लागली.

साहेबांना गम्मत वाटली.

तिचं काय होणार याची त्यांना पूर्ण कल्पना होती. फक्त तिची शिकार कशी होते इकडे त्यांचं लक्ष होतं,

"औंदा कशी गत आहे?"त्यांनी विचारलं.

"पाऊस त चांगला झाला." गडी म्हणाला, "पण घरात येईल तेव्हा खरं."

शांतता.

"मी काय म्हंतो,"

"हं..." भाऊंची नजर गड्याच्या बायकोच्या हालचाली टिपत आहे. तिचा गोरा देह त्यांना भुलावतो.

"घरकूल योजनेत आम्हाला काही मिळालं तर..."

"तुला घर न्हाई कां?"

ती दोरीनं गवताचा भार कसते आहे. कसताना तिच्या कमनीय देहाची मोहक हालचाल होते आहे.

"आहे. भैनीचं लगीन धरालं. तेवढीच मदत हुईल."

साहेबांना या क्षणाची वाट होती.

पाकोळी बेडकाजवळ येतेय. अजून जीभेच्या आटोक्यात यायचीय.

“अरे, घरासाठी कर्ज, घेऊन भैनीचं लगीन करणार?”

साहेबांची भाषा शुद्ध आहे. गावात गेलं की ते गावरान भाषेत बोलतात. भाषेतला आपलेपणा निवडणूकीत कामाला येतो.

गडी ओशाळवाणं हसतो.

“तुमी मनांत धरलं त हुन जाईल.”

“आता पह्ल्यावानी ऱ्हायलं न्हाई, इरोधी पक्षावाल्यांचं बारीक लक्ष असतं.”

“तुमी घाबरता व्हय कोनाला? तुमच्या इरोधात जायाला वाघाचं काळीज पायजे. काही म्हना, तुमच्याशी टक्कर घेनारा रहाळात कुनी नाय. तुमी मॅनेजरला निस्तं फोनवरून बोललं त मह काम हून जाईल.”

पाकोळी भिरभिरत बेडकाच्या मागच्या बाजूला गेली. बेडकानं आपली दिशा बदलली.

पाकोळीला कसली कल्पना नाहीय.

दुधाळलेली सांज काळवंडू लागलीय.

“ते करता ईल. पर आमचं एक काम करनं पडल.” भाऊ पुढे झुकून त्याचा अंदाज घेतात.

“तुम्ही निस्ता शबूद टाका.”

पाकोळी आता बेडकाच्या कक्षेत आलीय. जीभ बाहेर फेकायची की भक्ष्य...

अचानक जे घडलं ते पाहून भाऊंचे डोळे विस्फारले.

बेडकानं जीभ बाहेर काढलीही असेल, पण ती भक्ष्यापर्यंत पोहचण्याआधीच बेडकावर, कुठून तरी आलेल्या नागानं झडप घेतली आणि शिकारीसह तो गवतात सळसळत दिसेनाशा झाला.

आलेल्या आणि टळलेल्या संकटाला अनभिज्ञ पाकोळी अजून भिरभरतेय.

भाऊ एकाएकी गंभीर झाले. त्यांची नजर चांदण्या उमटू लागलेल्या आभाळाकडे गेली.

"तुमी फकस्त हुकुम करा. एक काय धा कामं करू की."

गड्याच्या बोलण्यानं ते भानावर आले.

"गड्या," आता त्यांचा स्वर बदलला, " तुला भैनीच्या लग्नाला काय मदत पायजे असंन ते सांग. मी खिशातून पाच पन्नास देईन, पर असलं वंगाळ कामं सांगू नको. चला आता घरला. अंधार वाढून राहिला."

भाऊ निघाले.

जाताना गड्याच्या बायकोकडे पाहण्याची त्यांची हिम्मत झाली नाही.

§§§

28.खिडकीतला चेहरा

केवळ, आणि मी पुन्हा सांगतो, केवळ मी गूढ-भयकथा लेखक आहे, म्हणून तुम्हाला वाटेल माझ्या डोक्यावर परिणाम झाला, मला भास झाला.

मला कुणी असला अनुभव सांगितला असता तर मीही विश्वास ठेवला नसता. झालं काय की-

मी आपल्या खोलीत नवी भय कादंबरीच्या लिखाणात गढून गेलो होतो. माझी लिखाणाची वेळ रात्रीची..

अचानक खिडकीच्या काचेवर नखानं केलेली टकटक ऐकू आली. मनाशी नवल करीत मी खिडकीचा पडदा बाजूला सारला.

एक अनोळखी चेहरा माझ्याकडे पाहत होता. आमची नजरा-नजर होताच तो म्हणाला, "ताबडतोब बेडरूममध्ये जा."

दुसऱ्याक्षणी तिथं कुणी नव्हतं. फक्त चंद्राचा शितल प्रकाश.

भारावल्यागत मी बेडरूमकडे धावलो.

पत्नी बिछान्यावर तडफडत होती. तिनं आवाज दिले असतील, पण माझ्या कानावर आले नव्हते. ताबडतोब तिला लगेच दवाखान्यात नेलं.

डॉक्टर म्हणाले- 'वेळेवर आणलंत. उशीर केला असता तर हाताला लागल्या नसत्या.'

काय म्हणालात? ह्यात घाबरण्यासारखं काय आहे?

‘अरे हो! तुम्हाला सांगायचं राहिलं, मी सातव्या मजल्यावर राहतो.’

§§§

29.सावलीसारखी---

काय प्रॉब्लेम आहे?

मनोरुग्ण पेशंटला मी व्यावसायिक आपुलकीनं विचारलं.

‘डॉक्टर, आठ दिवसांपूर्वी माझ्या पत्नीचा देहांत झालाय.’ पेशंट म्हणाला, ‘ती नेहमी म्हणायची, मी आयुष्यभर सावलीसारखी तुमची साथ देईन...’

‘नशिबवान आहात.’ मी म्हणालो, ‘त्यांच्या जाण्याचं तुम्हाला दु:ख होणं सहाजिक आहे. पण तुम्ही सावरायला हवं.’

‘मी ते स्वीकारलंय.’ पेशंट म्हणाला, ‘माझी समस्या निराळी आहे. ती गेल्यापासून मला माझ्या दोन सावल्या पडताना दिसतात. एक माझी आणि दुसरी—‘

‘दोन दिवे जळत असतील तर दोन सावल्या पडतात.’

‘तेच सांगतोय डॉक्टर, दोन दिवे असतील तर चार सावल्या दिसतात.’

‘असं पाहू या.’ त्याची समजूत काढण्यासाठी मी म्हणालो, ‘आपण एक प्रयोग करून पाहू. तुम्ही असं भिंतीशी उभा राहा पाहू. मी तुमच्यावर एकाच दिव्याचा प्रकाशझोत टाकतो. पाहू या भिंतीवर किती सावल्या दिसतात.’

‘किती सावल्या दिसतात?’

‘दोन’

मला एकही सावली दिसत नव्हती.

§§§

30.जैसे ज्याचे कर्म तैसे...

करकचून ब्रेक दाबताच कार थांबली.

टायर घासल्याच्या आवाजानं आजूबाजूच्या लोकांनी दचकून तिकडे पाहिले.

धड्क्क!

ड्रायव्हरनं शर्तीचा प्रयत्न केला तरी तो धडक टाळू शकला नाही.

सिग्नल बदलला आणि वाहनांची एकच झुबड उडाली होती.

समोरची मध्यमवर्गीय कार लाल बत्ती हिरवी होण्याची वाट पाहात होती. इंडिकेटर कार कुणीकडे वळणार याचा संकेत देत होतं. अचानक फोन वाजला. फोनवर बोलत असतानाच सिग्नल बदलला.

त्याच्या शेजारच्या किमती कारमध्ये त्याच वेळी गंगूचा फोन वाजला.

गंगू फोनवर बोलत नाही. फक्त ऐकतो.

फोन बंद करून ड्रायव्हरला सांगतो,

“गाडी वळव. हॉस्पिटलला जायचं. मायला, पोराला अपघात झाला. इमर्जंसी वार्डात दाखल केलं. जल्दी चल.. अरे, तोड सिग्नल!”

तेवढ्यात सिग्नलच बदलला.

गंगूच्या सांगण्याप्रमाणे, सिग्नलच्या गर्दीत त्याला अचानक गाडीची दिशा बदलावी लागली.

मध्यमवर्गीय कारलाही अचानक दिशा बदलावी लागल्यानं त्याची तारांबळ उडाली. ह्या वळावावळवीच्या गडबडीत दोन्ही गाड्यांचं बोनेट धडकलं.

कोपऱ्यात टपून बसलेला ट्राफीक हवालदार खुशीत तिकडे यायला निघाला.

खवळलेला गंगू खाली उतरला. मध्यमवर्गीय कारच्या ड्रायव्हर "सॉरी.." बोलून काहीतरी सांगण्याचा प्रयत्न प्रयत्न करू लागला-

परंतु त्याचं बोलणं घशातच विरलं. गंगूच्या हातातलं पिस्तूल पाहून त्याचे डोळे विस्फारले.

गंगूनं पिस्तुल त्याच्या कपाळावर टेकवलं आणि ट्रिगर दाबला.

तिकडे यायला निघालेला ट्राफिक पोलीस, कारमधून पिस्तूल घेऊन उतरलेल्या गंगूला पाहून, मागच्या मागे गायब झाला.

गंगू शांतपणे पुन्हा कारमध्ये येऊन बसला आणि शिवी हासडून म्हणाला,

"चल जल्दी. हॉस्पिटल. मायला माझा बच्चा तिकडे तडफडतो या आणि हा *** मध्येच कडमडला."

ड्रायव्हरनं सुसाट गाडी सोडली.

गंगू निघाला होता तात्याच्या अड्ड्यावर त्याचा हिशेब करायला.

रस्त्यात अशी बातमी मिळाली आणि त्याला हॉस्पिटलला जावं लागलं.

कार आगीच्या अँबुलन्ससारखी हॉर्न वाजवत वेगानं हॉस्पिटलला आली. बेसावध लोक गडबडीनं बाजूला झाले नसते तर धडकले असते. कार चालकाला त्याची फिकीर नव्हती. कार हॉस्पिटलच्या भिंतीत घुसते की काय असा संशय येण्याआधीच ड्रायव्हरनं कार थांबवली.

कारमधून आधी काळ्या कपड्यातल्या दोन धिप्पाड व्यक्ति खाली उतरल्या. त्यांचे चेहरे निर्विकार आणि क्रूर होते. त्यांच्या डोळ्यावर गॉगल होते. खाली उतरताच त्यांची नजर सर्वत्र फिरली. मग एकानं दार उघडलं. पांढऱ्या कपड्यातला गंगू उतरला.

त्याच्याही डोळ्यावर गॉगल आणि बोटांत अंगठ्या, उजव्या मनगटात सोन्याची पौची, डाव्या हातात सोनेरी घड्याळ, गळ्यात, शर्टच्या बाहेर रुळणारी सोन्याची टप्पोरी चेन.

त्याची ओळख पटताच लोकांची पांगापाग झाली.

गंगू सरळ हॉस्पिटलमध्ये गेला.

"कुठं आहे माझं पोरगं. कोण इलाज करतोय त्याचा?"

स्टाफनं त्याला इमर्जंसी वार्डात नेलं. तिथल्या डॉक्टरनं सांगितलं,

"मुलगा सीरियस आहे. प्राथमिक मदत दिली गेली आहे. तत्काळ ऑपरेशन करावं लागेल. डॉक्टर विश्वास, निष्णात सर्जन, तेच त्याचे प्राण वाचवू शकतात. त्यांना फोन केलाय. रात्रपाळी करून ते नुकतेच घरी गेले. अर्ध्यारस्त्यातून परत येत आहेत."

"कधी येतील?"

त्याच्या प्रश्नाला उत्तर द्यावं तशी ओपीडीत चालू असलेल्या टिव्हीवरील बातमी झळकली,

भर रस्त्यात सिग्नलवर डॉक्टर विश्वासांची गोळ्या झाडून हत्या!

गंगू पायातलं त्राण गेल्यासारखा मट्कन खाली बसला अन् धायमोकलून रडू लागला.

§§§

31.तसं सांग ना मग

खरं सांगायचं तर सिनेमा अतिशय भिक्कार होता.

थिएटरमध्ये मोजून दहा-पंधरा लोक विखरुन बसलेले असतील.

तो नेमका माझ्या समोरच येऊन बसल्यानं मला राग आला. दुसरं कारण असं होतं की त्याची उंची जास्त असल्यानं मला चित्रपट पाहण्यास अडथळा येत होता. पडद्यावरील चित्र पाहण्यासाठी मला मान वाकडी करुन पाहवं लागत होतं. अख्खं थिएटर रिकामं असून तो नेमका मला डिवचण्यासाठी येऊन बसावं तसा बसला होता.

मी जागा बदलली असती तरी चाललं असतं, पण मी आधी बसलेला असल्यानं मला विषेश अधिकार प्राप्त झाले होते.

“ओ मला दिसत नाही.”

“मग मी काय करु?” मान न वळता तो म्हणाला.

“तुम्ही सरकून बसा. बाजूची खुर्ची रिकामीच आहे ना!”

“तुम्ही जागा बदला ना.” तो म्हणाला.

“मी का म्हणून बदलू? मी आधीपासून बसलोय.” माझी सटकली. “तुम्ही एक सीट सरकून बसा.”

“मी सरकणार नाही. माझी रोजची हीच सीट आहे.”

“काय माणूस आहे? मुद्दाम समोर येऊन बसतो आणि म्हणतो माझी सीट आहे!”

“मुद्दाम नाही. हीच माझी सीट आहे. तुम्हाला काय अडचण आहे?”

“तुमचं डोकं मधे येतं. मला पडद्यावरचं नीट दिसत नाही.”

“असं सांगा की मग.” तो म्हणाला.

आणि पगडी काढून ठेवावी तशी त्यानं मानेपासून डोकं काढून बाजूच्या सीटवर ठेवलं.

समाप्त

संजय काळे

यांच्या

ई साहित्यवरील

दोन कादंबऱ्या

कव्हरवर क्लिक करताच उघडतील